




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९४ ■ सोमवार, दि. ४ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# बंगाल : भाजपची जोरदार मुसंडी ; ममतांचा गड उद्ध्वस्त !

## तीन राज्यात 'सत्ता'बदल, तामिळनाडूमध्ये टीव्हीकेचा 'विजय'



प्रतिनिधी ४ मे

**दिल्ली :** जवळपास संपूर्ण देशात भाजपची सत्ता असताना विरोधातील एकांड्या शिलेदाराप्रमाणे भाजपला आजपर्यंत शरण न गेलेल्या पश्चिम बंगालमध्ये भाजपने जोरदार मुसंडी मारत २०० पार जागा हस्तगत केल्या आहेत. सत्ता स्थापन्यासाठी १४८ जागांची आवश्यक असल्याने भाजपने एकहाती सत्ता मिळवल्याचे दिसून येत आहे. पश्चिम बंगालमध्ये गेली १५ वर्षे ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा अबाधित असलेला गड उद्ध्वस्त झाला आहे. देशातील अनेक राज्यं भाजपच्या ताब्यात जात असताना ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालचा गड टिकवून ठेवला होता. मात्र, सोमवारी जाहीर झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालावरुन आता याठिकाणी ।पची सत्ता येण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. पश्चिम बंगालमध्ये बहुमतासाठी १४८ जागांची गरज आहे. मतमोजणीच्या सध्याच्या कलानुसार, भाजपने २०० पार जागांवर आघाडी घेतली आहे. तर सत्ताधारी तृणमूल अवघ्या ८८ ठिकाणी आघाडीवर आहे. त्यामुळे आता पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदा भाजपची सत्ता येणार आहे. हे भाजपसाठी ऐतिहासिक यश मानले जात आहे. यापूर्वी २०१६ आणि २०२१ या दोन्ही विधानसभा निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालची सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपने सर्व ताकद पणाला लावली होती. मात्र, या दोन्ही निवडणुकांमध्ये तितक्याच इर्ष्येने लढून ममता बॅनर्जी यांनी भाजपची डाळ शिजू दिली नव्हती. मात्र, यंदा भाजपने कोणत्याही परिस्थितीत पश्चिम बंगाल काबीज करायचाच, असा चंग बांधला होता. त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून अमित शाह हे पश्चिम बंगालमध्ये स्वत: सूत्रं हलवत होते. पश्चिम बंगाल निवडणुकीचा प्रचार आणि मतदान या काळात अमित शाह हे अक्षरश: पश्चिम बंगालमध्ये तळ ठोकून बसले होते.

पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर अमित शाह यांनी पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या मोठ्या विजयाचे भाकीत केले होते. या निवडणुकीच्या मतदानावेळी तब्बल दोन लाख सीआरपीएफ जवान आणि कडेकोट बंदोबस्त पश्चिम बंगालमध्ये तैनात करण्यात आला होता. तसेच या निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने एसआयआर मोहीमेतंर्गत जवळपास ९० लाख मतदारांची नावे निवडणूक यादीतून काढून टाकली होती. ही गोष्ट पश्चिम बंगालच्या निवडणुकीत निर्णायक ठरल्याचे दिसत आहे.

(१ वाजेपर्यंतची आकडेवारी)

**पं. बंगाल (२९२)**
- ◆भाजपा १९४
- ◆टीएमसी ९३
- ◆काँग्रेस १
- ◆एलई-आयएसएफ २
- ◆इतर २

**आसाम (१२६)**
- ◆भाजपा ९८
- ◆काँग्रेस २४
- ◆इतर ४

**तामीळनाडू (२३४)**
- ◆टीव्हीके १०७
- ◆डीएमके ५८
- ◆एडीएमके ६९

**केरळ (१४०)**
- ◆काँग्रेस १०१
- ◆लेफ्ट ३७
- ◆इतर २

**पुद्दुचेरी (२९)**
- ◆भाजपा २२
- ◆काँग्रेस ६
- ◆इतर १

### अमित शहांचे भाकीत खरे ठरले!

पश्चिम बंगालमध्ये २४ एप्रिलला पहिल्या टप्प्याचे मतदान झाले होते, तेव्हा अमित शाह यांनी भाजप १५२ जागांपैकी ११० जागी विजय मिळवेल, असा अंदाज वर्तवला होता. तर पश्चिम बंगालमध्ये भाजपला १७० जागांवर विजय मिळेल, असे भाकीत त्यांनी वर्तवले होते. अमित शाह यांच्या तोंडातून बाहेर पडलेले हे वाक्य तंतोतंत खरे ठरताना दिसत आहे.

### या जागांवर भाजपचे वर्चस्व

भाजपचा सर्वात मजबूत गड मानल्या जाणाऱ्या उत्तर बंगालमध्ये ५४ पैकी ४० जागांवर भाजप पुढे आहे. अलीपूरद्वार आणि जलपाईगुडी जिल्ह्यात सर्व जागांवर भाजपने आघाडी घेतली आहे, तर कूचबिहारमध्ये टीएमसीला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागत आहे. कोलकातामधील रासबिहारी, एँटाली, माणिकतला, श्यामपुकूर तसेच नंदीग्राम, खडकपूर सदर आणि आसनसोल दक्षिण यांसारख्या महत्त्वाच्या जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. तर बीरभूम आणि दक्षिण २४ परगणा मधील काही जागांवर टीएमसीने आपली पकड टिकवून ठेवली आहे.

### वाराणसीत 'झालमुडी'चा जल्लोष



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचारादरम्यान झाडग्राममध्ये 'झालमुडी' खाल्ली होती, त्याचा प्रभाव निकालात स्पष्ट दिसत आहे. झाडग्राममधील चारही जागांवर भाजप आघाडीवर आहे. याचा जल्लोष थेट मोदींच्या वाराणसी मतदारसंघात पाहायला मिळत असून, तिथे भाजप कार्यकर्ते एकमेकांना 'झालमुडी' वाटून आनंद साजरा करत आहेत.

### विजय थलपतीची विजयी घोडदौड



सगळ्यात जास्त धक्कादायक निकाल तामिळनाडूमध्ये लागताना दिसत आहे. अभियनातून निवृत्ती घेऊन राजकारणात उतरलेल्या विजय यांच्या टीव्हीके पक्षाला जनतेने जनादेश दिल्याचे कलांमधून दिसत आहे. तामिळनाडून बहुमतासाठी ११८ जागा आवश्यक आहेत. टीव्हीकेने १ वाजेपर्यंतच्या निकालानुसार १०७ जागांवर आघाडी घेतली आहे. सत्तेत असलेली द्रमुक तिसऱ्या स्थानी फेकली गेली असून, अवघ्या ५८ जागांवर आघाडीवर आहे. तर अण्णाद्रमुक ६९ जागांवर आघाडीवर आहे. पीएमके ६ जागांवर, काँग्रेस ५ जागांवर आघाडीवर आहे. विजय यांच्या टीव्हीकेने स्टॅलिनच्या यांच्या द्रमुकला सत्तेतून खाली खेचण्यात यश मिळवले असून, हा मोठा धक्का त्यांच्यासाठी आहे.

### केरळात डाव्यांचा किल्ला ढासळला

सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवण्यात यशस्वी ठरलेल्या डाव्या लोकशाही आघाडीला यावेळी जनतेने विरोधी बाकांवर बसवले आहे. केरळात काँग्रेसने १०३ जागांवर आघाडी घेतली असून, सीपीआय(एम) पक्ष ३५ जागांवर आघाडीवर आहे. आययूएमएल २३ जागा, सीपीआय ११, तर केईसी ७ जागांवर आघाडीवर आहे.

### आसाममध्ये काँग्रेसची निराशा

आसाममध्ये सत्तांतर होण्याची अपेक्षा काँग्रेसला होती, पण मतदारांनी पुन्हा भाजपाला संधी दिल्याचे दिसत आहे. बहुमतासाठी ६४ जागा लागणाऱ्या आसाममध्ये भाजपाने ९८ जागांवर आघाडी घेतली आहे. काँग्रेस २४ जागांवर आघाडीवर असून, त्यानंतर इतर प्रादेशिक पक्षांचा क्रमांक लागतो. त्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षाचीच भूमिका पार पाडावी लागणार असे दिसत आहे.

### पुद्दुचेरीमध्ये भाजपा आघाडीला कौल!

पुद्दुचेरीमध्ये भाजपा आघाडीला पुन्हा कौल मिळाला आहे. भाजपा आघाडी २२ जागांवर पुढे आहे, तर काँग्रेस आघाडी ६ जागांवर पुढे आहे. त्यामुळे तेथील जनतेने भाजपला विजयी कौल दिल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

# सुनेत्रा पवारांना रेकॉर्डब्रेक मतदान !

- ◆ अजित पवारांचा विक्रम मोडला
- ◆ एकतर्फी विजयाच्या दिशेने वाटचाल

प्रतिनिधी ४ मे

**पुणे :** बारामती पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मताधिक्याचा विक्रम केला आहे. १ लाख ६५ हजार २६६ मतांचा जादुई आकडा पार करून १९ व्या फेरीअखेर त्यांनी तब्बल १ लाख ६८ हजार ५५५ मते मिळवली आहेत. बारामतीकरांनी सुनेत्रा पवारांना विक्रमी मतांनी निवडून देत राष्ट्रीय पातळीवर नोंद केली आहे.

या पोटनिवडणुकीत एकूण ५८.१७ टक्के मतदान झाले आहे. दोन लाख २३ हजार ७०५ बारामतीकरांनी मतदान केले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे झालेल्या या पोटनिवडणुकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या महायुतीच्या उमेदवार होत्या. काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी माघार घेतल्यामुळे प्रमुख राजकीय पक्षांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात नाहीत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह २३ उमेदवार होते. बारामतीतील मताधिक्याचा विक्रम दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावावर होता. २०१९ मध्ये त्यांनी भाजपचे तत्कालीन उमेदवार गोपीचंद पडळकर यांचा एक लाख ६५ हजार २६५ मताधिक्याने पराभव केला होता. त्यामुळे आता विक्रम मोडण्यासाठी एक लाख ६५ हजार २६६ हा जादुई आकडा मानला जात होता. अखेर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या जादुई आकडा पार करून विक्रमी मताधिक्य मिळवले आहे. आज मतमोजणीला सकाळपासून सुनेत्रा पवार यांनी आघाडी घेतली होती. एकूण २४ फेऱ्या पार पडल्या. त्यांच्यासोबत धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे आणि 'बिग बॉस मराठी'मधील अभिजित बिचुकले आणि इतर २० जणांचा समावेश होता. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विरोधात असलेले २२ उमेदवारांनी मिळून आतापर्यंत ३ हजार ८३० एवढी मते मिळवली आहेत.

### राहुरीत अक्षय कर्डिलेंचा विजयी जल्लोष!



◆**अहिल्यानगर :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत मतमोजणीला सुरुवात होताच राजकीय चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. पहिल्याच आठ फेऱ्यांमध्ये महायुतीचे उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी निर्णायक आघाडी घेत प्रतिस्पर्ध्यांना धक्का दिला आहे. आघाडी मिळताच कर्डिले मतमोजणी केंद्राकडे रवाना झाले असून संपूर्ण मतदारसंघात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत विजयाचे संकेत साजरे होताना दिसत आहेत. पहिली प्रतिक्रिया देताना अक्षय कर्डिले म्हणाले, की राहुरी-नगर मतदारसंघातील जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. भारतीय जनता पार्टीच्या सर्व वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे ही आघाडी मिळाली आहे. हा फक्त विजय नाही, तर जनतेच्या अपेक्षांची सुरुवात आहे.

# आज अमरावती येथे रिसोड व मालेगाव येथील वादग्रस्त शिक्षण संस्थेची एसआयटी समोर सुनावणी

संस्थाचालकाच्या रक्ताच्या नात्यातील बनावट नियुक्ती, बॅक डेट नियुक्ती
अल्पसंख्यांक प्रमाणपत्र नसताना केलेल्या बेकायदेशिर नियुत्त्या बाबत होणार सुनावणी
कथित व भ्रष्टाचारात आघाडीवर असलेल्या संस्थाचालकांसह त्यांच्या पाठीराख्या, अधिकाऱ्यांमध्ये खळबळ
एसआयटीची चौकशी दडपण्यासाठी संस्थाचालकांची शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून आर्थिक लूट

प्रतिनिधी ४ मे

**वाशीम :** वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथील डॉ.अल्लमा ईकबाल उर्दू शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव येथील बाल शिवाजी मराठी शाळा आणि विर वासुदेव बळवंत फडके उर्दू शाळेतील कथित बेकायदेशिर पदभरतीसह इतर गंभीर बाबीची आज सोमवार ४ मे रोजी अमरावती येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात एसआयटी च्या अधिकासमोर सुनावणी होणार आहे. एसआयटीच्या सुनावणीने भ्रष्ट संस्थाचालकांमध्ये खळबळ उडाल्याचे वृत्त असून दुसरीकडे एसआयटीची चौकशी दडपण्यासाठी शाळेतील शिक्षकांना प्रत्येकी 'सहा अंकी ' रक्कमेची मागणी करून शिक्षकांचीआर्थिक लूट करत असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.

मालेगाव येथील बाल शिवाजी मराठी शाळेत संस्थाचालकांनी शाळेमध्ये आवश्यक विद्यार्थी संख्या नसताना व २०२२ पर्यंत संचमान्यतेमध्ये एकही शिक्षकाचे पद रिक्त नसताना माजी शिक्षणाधिका यासोबत संगनमत करून त्यांच्या शाळेत २०१४ पासून काही शिक्षकांच्या बॅकडेट मध्ये नियुत्त्या केल्याची तक्रार कैलास टेकाळे व सुमेध टेकाळे यांनी एसआयटीकडे पुराव्यासह केली होती.त्यापुर्वी त्याच शाळेतील अन्यायग्रस्त शिक्षकाने वरिष्ठाकडे तक्रारी केल्या होत्या.त्या तक्रारीच्या अनुषंगाने सिटी न्युज सुपरफास्टने वृत्त मालिका प्रकाशित करून बाल शिवाजी मराठी शाळेतील भ्रष्ट कारभार उजेडात आणला होता.

आज अमरावती येथे एसआयटी समोर होणाऱ्या सुनावणीसाठी आणि सदर सुनावणीची कारवाई दडपण्यासाठी शाळेत बॅकडेटमध्ये नियुक्त केलेल्या शिक्षकांकडून संस्थाचालक चक्क सहा अंकी रक्कमेची मागणी करून संबंधित शिक्षकांची आर्थिक लूट करत असल्याची चर्चा आहे. तसेच मालेगाव येथील विर वासुदेव बळवंत फडके उर्दू शाळेचे अन्ययग्रस्त, माजी मुख्याध्यापक मोहम्मद तनवीर यांनी एसआयटीकडे तक्रार करुन कथित संस्थाचालकांचे काळे कारनामे पुराव्यासह वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिले आहेत.या संस्थेचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्रच रद्द झाल्यामुळे 'या' शाळेतील अनेक नियुत्त्या बनावट असल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे. या संस्थेच्या गैरप्रकार वाशीम येथील माध्यमिक शिक्षण विभागातील तत्कालीन व विद्यमान अधिकाऱ्यांनी लाखो रूपयांनी हात धुवून घेतल्याची चर्चा आहे.उल्लेखनिय म्हणजे मालेगाव येथील संजय गांधी शिक्षण संस्थेचे कथित संचालक गैरप्रकारात आघाडीवर असून ते महाशय कोणतेही प्रकरण न्यायालयामध्ये दाखल करून त्यांच्या काळ्या कारनाम्याना दडपण्यासाठी पुढाकार घेत असल्याची धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे.या संस्थेचे अनेक वाद वाशीम येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अमरावती येथील सह धर्मादाय आयुक्त आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये न्यायप्रवीष्ठ असल्याचे समजते. रिसोड येथील अल हिलाल अल्पसंख्यांक व समाजकल्याण संस्थेद्वारा संचालीत रिसोड येथील डॉ.अल्लमा ईकबाल उर्दू शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात कथित संस्था सचिवाने मुस्लीम समाजातील गरजू, होतकरू आणि पात्रताधारक उमेदवारांना डावलून फक्त रक्ताच्या नात्यातील व्यक्तीच्या बेकायदेशिर नियुत्त्या केल्याबाबतची पुराव्यानिशी तक्रार रिसोड येथील अन्यायग्रस्त रमीज खान आणि मालेगाव पंचायत समितीचे माजी सदस्य अकील खान यांनी एसआयटीच्या प्रमुखांकडे केली होती.या संस्थेतील गैरप्रकार सिटी न्युज सुपरफास्ट ने वृत्तमालिका प्रकाशित करून तक्रारकर्त्यांना न्याय मिळण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आता एसआयटीचे प्रमुख आणि त्यांच्या समितीतील सदस्य तक्रारकर्त्यांना न्याय देतात का ? त्यांचे खिसे भरून निघून जातात असा सवालही शिक्षण क्षेत्रातील जाणकारांकडून केल्या जातआहे.






CMYK CMYK

शिक्षण हीच ती शक्ती आहे, जी समाजात परिवर्तन घडवून आणू शकते, या उदात्त विचारावर वाटचाल करणारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आज केवळ पदव्या देणारे केंद्र राहिलेले नाही, तर ते जबाबदार नागरिक, उत्कृष्ट संशोधक, नवउद्योजक आणि सक्षम नेतृत्व घडवणारे एक सशक्त व प्रभावशाली व्यासपीठ बनले आहे. १ मे २०२६ रोजी आपला ४३ वा वर्धापन दिन साजरा करत असताना, विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम, पायाभूत सुविधा आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात जी गरुडझेप घेतली आहे, ती निश्चितच अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या या विद्यापीठाचा हा प्रवास राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एन.ई.पी. २०२०) यशस्वी अंमलबजावणीतून आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवत आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ : प्रगती, नवोपक्रम आणि मुल्यांचा गौरवशाली प्रवास

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि आधुनिक शिक्षणाची कास

आजचा काळ हा केवळ पुस्तकी ज्ञानाचा राहिलेला नाही, तर तो कौशल्य, नवकल्पना (इन्नोव्हेशन) आणि नैतिक मूल्यांचा आहे. हीच काळाची पावले ओळखून विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बहुविध संधी, प्रत्यक्ष अनुभव आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा ध्यास घेतला आहे. यासाठी इंटर्नशिप पोर्टलची सुरुवात करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता यावा, यासाठी ठोस पावले उचलली गेली आहेत. उद्योगक्षेत्राच्या गरजा ओळखून ए.ई.डी.पी. अंतर्गत बी.एस्सी. (डेटा सायन्स अँड ॲनॅलिटिक्स) आणि बी.कॉम. (रिटेल मॅनेजमेंट) यांसारखे नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात आले असून, त्यासाठी उद्योगांशी सामंजस्य कराराही करण्यात आले आहेत. आगामी काळात संलग्नित महाविद्यालयांमध्येही हे अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते केवळ अभ्यासक्रम शिकवण्यापुरते मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित विचार, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम रुजविण्याचे महान कार्य विद्यापीठातील प्राध्यापक करत आहेत. संविधानातील मूल्ये आत्मसात करून प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेने जीवन जगण्याचा संदेश विद्यापीठ विद्यार्थ्यांना देत आहे.

### आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि जागतिक तंत्रज्ञानाकडे वाटचाल

तंत्रज्ञानाच्या या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स, आणि बायोटेक्नॉलॉजी या क्षेत्रांत भारत जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे, यात अमरावती विद्यापीठाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. येणारा काळ हा 'ए.आय.' चा आहे, हे ओळखून विद्यापीठाने 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग' स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे २५ कोटी रुपयांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पाठविला आहे. यामुळे विद्यापीठाचे संशोधन जागतिक दर्जाचे होणार आहे. विशेष म्हणजे, विद्या परिषदेने चारही विद्याशाखेतील पदवी (युजी) प्रोग्रामच्या पाचव्या सेमिस्टरला 'इंट्रोडक्शन टू ए.आय.' हा विषय अनिवार्य करून एका नव्या क्रांतीची सुरुवात केली आहे.

विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान मिळावे यासाठी विद्यापीठाचे इंटरनेट नेटवर्क १ जी.बी.पी.एस. वरून तब्बल १० जी.बी.पी.एस. पर्यंत अद्ययावत केले जात आहे. या प्रकल्पासाठी ३.१५ कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक फायरवॉल, कोअर स्विचेस आणि ओ.एफ.सी. प्रणाली उभारली जात आहे. पीएम-उषा अंतर्गत मिळालेल्या अनुदानातून विद्यापीठ परिसरात ७५ नवीन वायफाय ॲक्सेस पॉईंट्स बसवले असून, लवकरच आणखी ५० पॉईंट्स जोडून कनेक्टिव्हिटी अधिक भक्कम केली जाणार आहे. यामुळे हे विद्यापीठ खऱ्या अर्थाने 'नेक्स्ट जनरेशन' शैक्षणिक केंद्र बनत आहे.

### संशोधन, पेटंट आणि आंतरराष्ट्रीय यश

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात संशोधनाची एक नवी लाट आली आहे. संशोधकांना पेटंट नोंदविण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नवीन आय.पी.आर. (पेटंट) पॉलिसी अपलोड करण्यात आली आहे. व्यवस्थापन शास्त्र (एम.बी.ए.) विभागाचे प्रमुख डॉ. दिपक चाचरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'बाऊंडेड रॅशनॅलिटी कॅलक्युलेटर' साठी मिळविलेला कॉपीराईट हा विद्यापीठाच्या बौद्धिक क्षमतेचा मोठा पुरावा आहे.

बायोटेक्नॉलॉजी विभागाने तर संशोधनात उत्तुंग शिखरे गाठली आहेत. डॉ. अनिता पाटील यांना मिळालेला 'बेस्ट सीनियर सायंटिस्ट' पुरस्कार त्यांच्या संशोधनाची पावती देतो. हर्बल उत्पादने विकास आणि प्रमाणीकरण केंद्र या अठरा लाख रुपयांचा भरीव निधी मिळालेल्या प्रकल्पाला सुरुवात होत आहे. संगणकशास्त्र विभागातील डॉ. रत्नशील खोब्राागडे यांना मिळालेले पेटंट ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे. तसेच पूजा मांडविय, डॉ. प्रशांत ठाकरे आणि डॉ. निरज धनवटे यांच्या संशोधन निबंधाला आंतरराष्ट्रीय परिषदेत दुसरे पारितोषिक आणि 'साऊथ आफ्रिकेचे पेटंट' मिळाले आहे. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण शाश्वतता परिषदेत पीएचडी स्कॉलर कु. अनघा उंदरीवाडे आणि डॉ. अनिता पाटील यांना प्रथम पारितोषिक मिळाले. अचल जाधव आणि दिव्या अंबाडकर या विद्यार्थिनींची जर्मनीतील नामांकित विद्यापीठात ए.आय. च्या उच्च शिक्षणासाठी झालेली निवड विद्यापीठाचा जागतिक दबदबा वाढवत आहे.

### स्टार्टअप्स, नवउद्योजकता आणि जागतिक ओळख

आपले विद्यापीठ आता केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता 'इन्नोव्हेशन आणि उद्योजकतेचे' मोठे केंद्र बनत आहे. इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून स्टार्टअप्सना 'सीड फंड' दिला जात आहे. केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेंतर्गत अमरावती




विद्यापीठातील ७ स्टार्टअपची निवड झाली. या स्टार्टअप्सला ५२ लक्ष रुपयाचा सीड फंड देण्यात आला, हे मोठे यश मानल्या जाते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी नुकतेच 'ज्युनिअर हॅकेथॉन' चे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले. आनंद यादव यांच्या ठस्टार्टअप की यात्राठ या पुस्तकाची जागतिक पुस्तक मेळाव्यात झालेली निवड विद्यापीठाच्या बौद्धिक संपदेचा सन्मान आहे. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व उद्योजकता निर्माण होण्यासाठी बूट कॅम्प, आयडियाथॉन, बिझिनेस प्लॅन कॉम्पिटिशन अशाप्रकारचे उपक्रम विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात राबविले, त्यामुळे स्टार्टअप एक्स्पो २०२६ मध्ये मोठा सहभाग राहिला. जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी आफ्रिकन आणि इतर देशांतील विद्यापीठांशी संपर्क साधून १२ परदेशी विद्यापीठांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

### पायाभूत सुविधांचा विकास आणि नवीन उपक्रम

पीएम-उषा योजनेंतर्गत तब्बल ४० कोटी रुपये खर्चून विद्यापीठात बहुउद्देशीय सभागृह, मुलींचे वसतिगृह, क्लासरुम कॉम्प्लेक्स, बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजचे बांधकाम, तसेच फिजिकल एज्युकेशन आणि बायोटेक सारख्या विभागांचे नूतनीकरण वेगाने सुरू आहे. अकोला येथे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून, चिखलदरा येथे 'ट्रायबल स्कील डेव्हलपमेंट सेंटर' चा प्रस्तावही शासनाधीन आहे. सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस अ?ण्ड रिसर्चची स्थापना झाली असून 'पीजी डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शिअस डिसीजेस' हा अभ्यासक्रम जून २०२६ पासून सुरू होत आहे.

### सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील ऐतिहासिक सुवर्णभरारी

शैक्षणिक यशासोबतच विद्यार्थ्यांच्या कला आणि क्रीडा गुणांना वाव देण्याचे मोठे काम विद्यापीठ करत आहे. गेल्या वर्षभरात सांस्कृतिक क्षेत्रात विद्यापीठाने 'न भूतो न भविष्यती' अशी कामगिरी केली आहे. एम.जी.एम. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित ३९ व्या मध्य विभाग आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात विद्यापीठाने २३ विद्यापीठांना मागे टाकत, इतिहासात पहिल्यांदाच २४ पारितोषिकांसह ऐतिहासिक 'चॅम्पियनशिप' पटकावून सुवर्ण इतिहास रचला ! तसेच जळगाव येथील 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सवात आठ पारितोषिके मिळवली. अमरावती येथील श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात आयोजित युवा महोत्सवात तीनहजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्लीच्यावतीने शुलिनी विद्यापीठ, सोलन (हिमाचल प्रदेश) येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय संशोधन महोत्सव 'अन्वेषण - २०२६' या स्पर्धेत अमरावती विद्यापीठाचा संशोधक विद्यार्थी श्री अजिंक्य पोटे याने प्रथम क्रमांक प्राप्त करुन विद्यापीठाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव वाढविला. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात अमरावती विद्यापीटाने आठ पारितोषिकांसह तिसरे स्थान मिळविले.राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेत विद्यापीठाच्या रासेयो चमूची उत्कृष्ट कामगिरी राहिली.

क्रीडा क्षेत्रातही आपले विद्यार्थी मागे नाहीत. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष व महिला स्पर्धा विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न झाली. या स्पर्धेत प्रथमत:च पुरुष व महिला चमूने प्रथम क्रमांक प्राप्त करुन विद्यापीठाचा नावलौकीक राष्ट्रीय स्तरावर पोहचविला. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आव्हान स्पर्धेत अमरावती विद्यापीठाने उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्काराचा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर आपले नांव कोरले.यशदीप भोगे या विद्यार्थ्याने एशियन आर्चरी चॅम्पियन स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले. मुलांच्या फुटबॉल संघाने पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत प्रथम स्थान मिळवले, तर ज्युदो आणि वेटलिफ्टिंग मध्येही खेळाडूंनी राष्ट्रीय यश मिळवले. खेळाडूंसाठी अद्ययावत क्रीडा संकुल आणि सिंथेटिक ट्रॅकची उभारणी करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे.

### सामाजिक बांधिलकी आणि संत गाडगे बाबांची दशसूत्री

संत गाडगे बाबांच्या नावाने ओळखले जाणारे हे विद्यापीठ बाबांच्या दशसूत्रीचे काटेकोरपणे पालन करत आहे. कुलगुरूंनी स्वत: सप्त्नीक अनाथ, निराधार मुलींचे कन्यादान केले, तसेच संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राच्यावतीने गरजूंना वस्त्रदान करण्यात आले. ज्या ठिकाणी गाडगे बाबांनी अखेरचा श्वास घेतला, त्या वलगाव येथील आश्रमात वृद्धांना कुलगुरूंच्या हस्ते शालींचे वाटप करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या २७,६०० स्वयंसेवकांची फौज आज समाजसेवेचे व्रत घेऊन कार्यरत आहे. प्रजासत्ताक दिनाच्या परेडपासून ते कुल्लू मनाली येथील नॅशनल ॲडव्हेंचर कॅम्पपर्यंत विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटवला आहे. पर्यावरण रक्षणाचा वसा घेत विद्यापीठात १,१११ रोपट्यांचे वृक्षारोपण करण्यात आले. अमरावती महानगरपालिकेला केंद्र शासनाचा 'स्वच्छ हवेसाठी' देशातून जो प्रथम पुरस्कार मिळाला, त्यात विद्यापीठाच्या निसर्गरम्य आणि हिरव्यागार परिसराचे मोठे योगदान आहे. विद्यापीठाने माजी विद्यार्थ्यांचा 'ऋणानुबंध' भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे नेत्रदिपक आयोजन केले. या मेळाव्यात देश-विदेशातील विद्यार्थी सहभागी झाले होते. याच मेळाव्यात यु.डी.आर.एफ. मध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल भौतिकशास्त्र विभाग, व्दितीय संगणकशास्त्र व तृतीय बायोटेक्नॉलॉजी विभागाचा कुलगुरूंनी सत्कार केला.

### विद्यापीठाचे पुरस्कार

विद्यापीठ पर्यावरण पुरस्कार २०२४ चा संस्था गटात जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिड, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणाचे प्राचार्य डॉ. विजय हिम्मतराव नागरे यांना प्रदान करण्यात आले. तर २०२५ चा संस्था गटात मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशीम या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात अमरावतीचे श्री वसंत माणिकराव पाटील यांना प्रदान करण्यात आला. कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा संत गाडगेबाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था गटात दिव्या फाउंडेशन, वरवंड, जि. बुलडाणा या संस्थेला, तर व्यक्तिगटात अमरावती येथील श्री मनिष पावडे यांना प्रदान करण्यात आला.

विद्यापीठ स्थापना दिवस १ मे रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयातील शिक्षक अधिकारी व कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी हा पुरस्कार विद्यापीठ शिक्षक संवर्गामध्ये गृहविज्ञान विभागातील डॉ. संयोगिता विलास देशमुख यांना, प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात परीक्षा विभागातील सहाय्यक कुलसचिव श्री मिलींद दत्तात्रय देशपांडे, महाविद्यालय विभागाच्या सहाय्यक कुलसचिव डॉ. साक्षी संजयसिंह ठाकूर यांना, द्वितीय श्रेणी संवर्गात आस्थापना विभाग अधीक्षक अमोल अशोकराव म्हैसाळकर, परीक्षा विभागाच्या अधीक्षक सौ. स्मिता अमोल म्हैसाळकर यांना, तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात वित्त विभागातील वरिष्ठ सहाय्यक संजय गुलाबराव कोकाटे, ज्ञानस्त्रोत केंद्र येथील ग्रंथालय सहाय्यक कु. ज्योती तुकाराम गेडाम यांना, तर चतुर्थ श्रेणी कर्मचारी संवर्गात सामान्य प्रशासन विभागातील चौकीदार श्री मोरेश्वर शंकर आप्पा मुंजाळे यांना घोषित झाला आहे. संलग्नित महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था वर्गवारी प्राचार्य संवर्गात इंदिरा महाविद्यालय, कळंब येथील प्राचार्य डॉ. पवन भाऊ मांडवकर यांना, संलग्नित महाविद्यालय शिक्षक संवर्गात गो.सी. टोम्पे कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदूरबाजार येथील रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर दिनकरराव गव्हाळे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री दीपक धोटे यांना, तर शिक्षकेतर कर्मचारी संवर्गात इंदिराबाई महिला महाविद्यालय, अमरावतीचे अधीक्षक श्री प्रशांत केशवराव देशमुख यांना घोषित झाला आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये 'एन.ई.पी. स्कुल कनेक्ट' साठी भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा या महाविद्यालयाची निवड झाली आहे. सर्वांचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अभिनंदन केले आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा हा वर्धापन दिन केवळ एका वर्षाची सांगता नसून, नव्या युगाच्या आव्हानांना सामोरे जाण्याची एक नवी सुरुवात आहे. कौशल्य हेच चलन असलेल्या आजच्या जगात, संत गाडगे बाबांच्या स्वच्छतेच्या व कर्मयोगाच्या विचारांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन हे विद्यापीठ विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर नेण्याचे स्वप्न साकार करत आहे. सशक्त, समतावादी आणि विकसित भारताच्या उभारणीसाठी ज्ञान, संशोधन आणि समाजसेवा यांचा अनोखा संगम या विद्यापीठात पाहायला मिळत आहे. वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या कुशल नेतृत्वाखाली विद्यापीठ विकासाचा रथ घौडदौड करीत असून या विद्यापीठाला मनुष्यबळ कमी जरी असले तरी असलेले मनुष्यबळ विद्यापीठाच्या विकासात त्यांना समर्थपणे साथ देत आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची विकासात्मक वाटचाल सुरू असून या विद्यापीठाच्या वाटचालीत अनेकांचे परिश्रम फळाला लागले आहेत. विद्यापीठाच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !

**( डॉ. विलास नांदुरकर )**
जनसंपर्क अधिकारी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## दिन विशेष

### आज जागतिक अग्निशामक दिन



दरवर्षी ४ मे रोजी आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन साजरा केला जातो. अग्मिशामक दल हे इतरांना वाचवतात त्यांच्या सन्मानासाठी हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे शौर्य आणि निस्वार्थ भावनेने समाजाची सेवा करणाऱ्या लोकांचे कौतुक करण्याचा एक प्रसंग आहे. जळत्या इमारतींपासून ते जंगलातील आगीपर्यंत, अग्निशामक कुठेही आणि कोणत्याही क्षणी प्राणघातक आग विझवण्यास सज्ज असतात. या दिवसाची सुरुवात कशी हे जाणून घेऊया.

जगभरातील अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या बलिदानाचा आणि शौर्याचा सन्मान करण्यासाठी १९९९ मध्ये आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाची स्थापना करण्यात आली. जंगलातील आगीशी झुंजताना पाच ऑस्ट्रेलियन अग्निशमन दलाच्या जवानांना आपला जीव गमवावा लागला आणि त्यामुळे हा दिवस साजरा करायला सुरूवात झाली. जेसन थॉमस, ख्रिस इव्हान्स, गॅरी व्रेडेव्हल्ट, मॅथ्यू आर्मस्ट्राँग आणि स्टुअर्ट डेव्हिडसन या सर्व शूर अग्निशामकांनी कर्तव्य बजावताना आपले प्राण गमावले. या दुर्दैवी घटनेच्या परिणामी, आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाची निर्मिती झाली. तेव्हापासून हा दिवस जागतिक कार्यक्रमात रूपांतरित झाला आहे, जो सर्वत्र अग्निशमन दलाच्या जवानांचे धैर्य, शक्ती आणि निस्वार्थीपणा प्रतिबिंबित करतो आणि साजरा करतो. हा दिवस मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांच्या अमूल्य योगदानाचे आणि आगीच्या धोक्यांपासून जीवन आणि मालमत्तेचे रक्षण करण्याच्या त्यांच्या अटळ वचनबद्धतेचे स्मरण करतो. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन हा एक अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. कारण तो अग्निशमन दलाच्या असाधारण धैर्य आणि त्यागाला समर्पित आहे. स्वतः आग आणि इतर धोक्यांना न घाबरता, ते इतरांना वाचवण्यासाठी नेहमीच तयार असतात. हा प्रसंग त्यांच्या अटल शौर्याची, निस्वार्थीपणाची आणि समाजाप्रती असलेल्या वचनबद्धतेची मार्मिक आठवण म्हणून साजरा केला जातो. इतकेच नाही तर, हा दिवस अग्निसुरक्षा जागरूकता वाढविण्याचे आणि अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना त्यांची महत्त्वाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक संसाधने आणि उपकरणे देऊन त्यांना पुरेसा पाठिंबा देण्याचे महत्त्व सांगतो. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचे प्रतीक लाल आणि निळा रिबन आहे. या रिबनमध्ये दिलेल्या दोन्ही रंगांचे स्वतःचे वेगळे महत्त्व आहे. लाल रंग अग्नि तत्वाचे प्रतिनिधित्व करतो आणि निळा रंग पाण्याचे तत्व दर्शवतो. ४ मे हा दिवस निवडण्यामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, याच दिवशी कॅथलिक परंपरेनुसार अग्निशमन दलाचे संरक्षक संत 'सेंट फ्लोरियन' (ऐंग्हू इर्त्दैग्हे) यांचा सण असतो. सेंट फ्लोरियन हे स्वतः रोमन सैन्यात अधिकारी होते आणि त्यांनी आग विझवण्याचे आणि इतरांना वाचवण्याचे मोठे कार्य केले होते. तेव्हापासून ४ मे हा दिवस जगभरात त्यांच्या सन्मानार्थ आणि अग्निशमन जवानांच्या योगदानाची आठवण ठेवण्यासाठी निवडला गेला. अग्निशमन दलाचे काम केवळ आग विझवण्यापुरते मर्यादित नाही. त्यांचे कार्यक्षेत्र अत्यंत विस्तृत आणि तितकेच आव्हानात्मक आहे. शहरांमधील आगी, औद्योगिक दुर्घटना, पूर, भूकंप, रस्ते अपघात किंवा इतर कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती असो, हे जवान सदैव तत्पर असतात. जेव्हा सामान्य माणूस संकटात अडकतो, तेव्हा अग्निशमन दलाचे जवान ढिगाऱ्यांमधून, आगीच्या ज्वालांमधून आणि विषारी धुरांमधून लोकांना बाहेर काढतात. आगीशी लढा देणे म्हणजे एखाद्या अदृश्य आणि हिंस्त्र शत्रूशी मुकाबला करण्यासारखे असते. यासाठी त्यांना प्रचंड शारीरिक आणि मानसिक धैर्याची गरज असते. प्रत्येक जवानाला अत्यंत कठीण प्रशिक्षणातून जावे लागते. आग लागल्यानंतर पहिल्या काही मिनिटांत योग्य निर्णय घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणणे हे त्यांचे मुख्य कौशल्य असते.

# आरोग्यदायी मूग, अत्यंत गुणकारी



आहार टिप्समध्ये विविध डाळींची माहिती आपण जाणून घेणार आहोत. यामध्ये आज मुग याविषयी जाणून घेऊ या. भारतीय स्वयंपाकघरात डाळींचे विविध प्रकार असतात. जीवनात साधा, संतुलित आणि पचायला सोपा आहार महत्त्वाचा आहे. अशा वेळी मुगासारखी डाळ आपल्या रोजच्या आहारात असणे म्हणजे आरोग्याचा मजबूत पाया घालण्यासारखे आहे. त्यामुळे 'साधेपणात आरोग्य' हा मंत्र जपत मुगाचा नियमित आहारात समावेश करणे हीच खरी आरोग्यदायी सवय ठरते.

'कषायमधुरो रूक्षः शीत : पाके कटुर्लघु : । विशद : श्लेष्मपित्तघ्नो मुद्ग : सूप्योत्तमो मत : ?' - आयुर्वेदीय दृष्टिकोनातून 'मुद्ग' (मूग) याचे महत्त्व भारतीय आहार संस्कृतीत साधेपणातही आरोग्यदायी मूल्ये दडलेली आहेत. आयुर्वेदाने अन्नाला केवळ पोटभरण्याचे साधन न मानता, शरीर-मन संतुलित ठेवणारे औषध मानले आहे. वरील श्लोकात 'मुद्ग' म्हणजेच मूग या कडधान्याचे गुणधर्म अत्यंत नेमकेपणाने मांडले आहेत. हा श्लोक मूगाचे स्वरूप, त्याचे गुण, पचनानंतरचा परिणाम महत्त्वाचा आहे. मुगासारखी डाळ आपल्या रोजच्या आहारात असणे म्हणजे आरोग्याचा मजबूत पाया घालण्यासारखे आहे. त्यामुळे 'साधेपणात आरोग्य' हा मंत्र जपत मुगाचा नियमित आहारात समावेश करणे हीच खरी आरोग्यदायी सवय ठरते.

'कषायमधुरो रूक्ष : शीत : पाके कटुर्लघु : । विशद : श्लेष्मपित्तघ्नो मुद्ग : सूप्योत्तमो मतः ?' - आयुर्वेदीय दृष्टिकोनातून 'मुद्ग' (मूग) याचे महत्त्व भारतीय आहारसंस्कृतीत साधेपणातही आरोग्यदायी मूल्ये दडलेली आहेत. आयुर्वेदाने अन्नाला केवळ पोटभरण्याचे साधन न मानता, शरीर-मन संतुलित ठेवणारे औषध मानले आहे. वरील श्लोकात 'मुद्ग' म्हणजेच मूग या कडधान्याचे गुणधर्म अत्यंत नेमकेपणाने मांडले आहेत. हा श्लोक मूगाचे स्वरूप, त्याचे गुण, पचनानंतरचा परिणाम आणि शरीरावर होणारे परिणाम यांचा सखोल आढावा देतो.

डॉ. खडक्कार सांगतात की, मुगामध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. तसेच मुगाचे सेवन केल्याने पोट साफ राहते, सूज कमी होते आणि शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यास मदत होते. आयुर्वेदीय दृष्टीने पाहिले तर मुग कफ आणि पित्त दोष कमी करण्यास उपयुक्त आहे. ज्यांना आम्लपित्त, उष्णतेचा त्रास किंवा त्वचेचे विकार असतात, त्यांनी नियमित मुगाचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते. तसेच वजन नियंत्रणासाठीही मुग उपयुक्त आहे, कारण तो कमी कॅलरीचा आणि जास्त पौष्टिक असतो. आजच्या धावपळीच्या जीवनात साधा, संतुलित आणि पचायला सोपा आहार फायदेशीर आहे.

पचनानंतरचा परिणाम आणि शरीरावर होणारे परिणाम यांचा सखोल आढावा देतो. या श्लोकातील प्रत्येक शब्द मूगाच्या एखाद्या वैशिष्ट्याला अधोरेखित करतो.

'कषायमधुरः' म्हणजे मूगाची चव कषाय (तुरट) आणि मधुर (गोडसर) अशी असते. या दोन रसांमुळे शरीरात संतुलन निर्माण होते. 'रूक्षः' म्हणजे त्याचा स्वभाव कोरडा आहे, ज्यामुळे शरीरातील अति स्निग्धता आजच्या आधुनिक जीवनशैलीत जंक फूड आणि अति मसालेदार आहारामुळे पचनसंस्था बिघडते. अशा वेळी मूगासारखा साधा पण गुणकारी आहार शरीराला संतुलित ठेवतो. मूगाची खिचडी, उसळ, डाळ किंवा सूप - कोणत्याही रूपात तो आरोग्यासाठी लाभदायक ठरतो. विशेषतः उपवासानंतर, आजारातून बरे होताना किंवा शरीराला विश्रांती देण्यासाठी मूग हा सर्वोत्तम पर्याय आहे.

डॉ. राधा खडक्कार
अकोला
मोबाईल - ८८०५६४३६२४

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# मारवाडी युवा मंच, उदय शाखेचा गोसेवा उपक्रम संपन्न

**अकोला:** सामजिक व मानवीय सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या किशोरवयीन मुलांच्या मारवाडी युवा मंच, उदय शाखेच्या वतीने गौसेवा उपक्रम साकार करण्यात आला. अ भा मारवाडी युवा मंच उदय शाखेच्या वतीने अक्षय तृतीया निमित्ताने हा प्रेरणादायी व प्रशंसनीय सामाजिक प्रकल्प आयोजित केला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी गौमातेची सेवा करत त्यांना टरबूज भरवून सेवा कार्य केले. मंचचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनात व शाखा अध्यक्ष मानव भट्टड व सचिव अर्जुन अग्रवाल यांच्या पुढाकारात संपन्न या सेवा कार्यात प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रूंगटा, प्रांतीय संयुक्त मंत्री स्वप्निल जैन समवेत अर्जुन अग्रवाल, यश भट्टड, शुभम बोरा, जतिन केडिया, राहुल चितलांगे, केशव भाला, यश सिंघानिया, देवांश गुप्ता, ऋषभ चिरानिया व नेहा हनी अग्रवाल यांचा विशेष वाटा राहिला.

## संतांचे आपल्यावर उपकार - हभप वर्षाताई काळे



**अकोला:** संतांचे आपणावर अनन्यसाधारण उपकार आहेत. आपल्या हातून चांगले कार्य घडले पाहिजे यासाठी संत सदा आपणास जागृत करीत असतात. ज्याप्रमाणे माता आपल्या मुलाचे लक्षपूर्वक संगोपन करीत असते. त्याचप्रमाणे संत भक्तांचे सातत्याने संगोपन करीत असतात. अशा संतांच्या उपकाराची परतफेड होऊ शकत नाही. मात्र संत संगतीने आपले जीवन कृतार्थ होऊन जीवनाची सफल इतिश्री होऊ शकत असल्याचे प्रतिपादन स्थानीय रामनगर येथील आदर्श कीर्तन कुल येथे हभप डॉ अभय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात कीर्तन अलंकार चे प्रशिक्षण घेत असणाऱ्या कीर्तनकार हभप सौ वर्षाताई काळे यांनी केले.

## निधन वार्ता

### भगवानराव राऊत



**हिवरखेड:** येथील भगवानराव पंढरी राऊत यांचे आज सकाळी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज संध्याकाळी ५ वाजता राठी काम्प्लेक्स बस स्टैंड समोरून स्मशानभूमी अकोट रोड येथे निघेल.

# हिंदू राष्ट्राची घोषणा करून मोदींनी देशवासियांशी मन की बात करावी- टी. राजा सिंह

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** देशातील हिंदूंवरील अन्याय, अत्याचार थांबविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हिंदूराष्ट्राची घोषणा करुन हिंदूच्या मनातील संकल्प पूर्ण करावा असे आवाहन तेलंगणातील भाग्यनगरचे आमदार टी. राजासिंह यांनी केले. हिंदू राष्ट्र समन्वय समितीच्या सभेत ते बोलत होते. गोरक्षण मार्गावर एकवीरा मैदानात रविवारी रात्री जाहीर सभा झाली.

पंतप्रधान मोदींकडून देशवासीयांची मोठी अपेक्षा असून, आता रिटायर्ड न होता, हिंदूराष्ट्र निर्मितीचा महत्वकांक्षी निर्णय घ्यावा. हे ऐकण्यासाठी देशातील हिंदू व्याकुळ आहेत. एक देश एक कायदा अस्तित्वात आणून लोकसंख्या नियंत्रणासाठी दोन पेक्षा अधिक अपत्य नको, अशी सक्ती करा, अधिक अपत्य असणाऱ्यांना सुविधा देऊ नका, असे आवाहन आ. टी. राजासिंह यांनी केले.

सभे पुर्वीच पोलिसांकडून मला नोटीस बजावण्यात आली, सभेला संबोधित करतांना मी काही शब्दांचा वापर करु नये, अशी अट घालण्यात




आली. अमूक शब्द वापरू नका असे संविधानात नमूद आहे का तसे असेल तर मी बोलणार नाही.

राज्यातील भगवाधारी सरकारने देखील यापुढे अधिक कणखर होऊन कार्य करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देवाभाऊ असे संबोधित करुन छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथील औरंगजेब यांच्या कबरीच्या देखभालीसाठी राज्य सरकार ६ लाख ५० हजार निधी देते. राज्यातून औरंगजेबाचे नामोनिशान मिटवण्यासाठी पावले उचण्याची गरज आहे. निधी काय देता, बुलडोजर चालवा, खुलताबाद येथील मुघल बादशहा औरंगजेबाची कबर उखडून टाका. देवाभाऊ तुम्ही असे केल्यास तुम्हाला हिंदू कधीच विसरणार नाही. असेही आ.टी. राजासिंह म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी औरंगजेबाची कबर हटवून तिथे शौचालय बांधावे, अशी महाराष्ट्रातील हिंदूंची इच्छा आहे. महाराष्ट्रात औरंग्याची कबर नको. त्याने आमच्या संभाजीराजाला हाल हाल करून ठार केले. त्यामुळे त्याची कबर हटवण्यासाठी मावळे हवे असतील, तर आम्ही लाखोंच्या संख्येने येऊ आता हिंदू जागृत झालेला आहे असे टी राजासिंह म्हणाले. सभेच्या प्रारंभी हिंदूराष्ट्र समन्वय समितीचे महाराष्ट्र, छत्तीसगड समन्वयक सुनील धनवट, सुनीता खाडे, उदय महा यांची भाषणे झालीत.

हिंदू राष्ट्र स्थापनेसाठी प्रत्येक गावात ग्राम सुरक्षा दलाची स्थापना करण्यावर त्यांनी भर दिला. हिंदूराष्ट्र निर्मातीच्या दिशेने पाऊले परिपक्व करण्यासाठी सर्वांनी जातीभेद विसरून एक व्हावे, लव्ह जिहाद, लॅंड जिहाद रोखण्यासाठी प्रत्येक गावात ग्राम सुरक्षा दलाची स्थापना करावी, शहरी भागात विभागानुसार सुरक्षा दलाची स्थापना करण्यासाठी युवकांनी पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आमच्या मुली सुरक्षित नाही, गड किल्ल्यावर अतिक्रमण होत आहे. तसेच अकोला महापालिकेत

टीपू सुलतान सभागृहाचे नाव बदलण्यात यावे. आणि सभागृहाला छत्रपती संभाजी महाराजांचे नाव द्यावे. शिवाजी कोण होता या पुस्तकावर बंदी घातली पाहिजे तसेच अकोला महानगरपालिका स्थायी समिती सभागृहाला देण्यात आलेले टीपू सुलतान सभागृह है नाव बदलण्यात यावे या मागणीसाठी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयावर गुरुवार, ७ मे रोजी हिंदू राष्ट्र समन्वय समितीच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असून सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. अयोध्येतील श्रीराम मंदीर निर्मितीसाठी वादग्रस्त ढाचा उध्वस्त प्रकरणी खुलेआम समर्थन करणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मी भक्त असून, त्यांच्या मार्गावर मी पुढे जात आहे, मी कोणाच्याही धमक्यांना घाबरत नाही, माझ्यावर शब्दांचे प्रतिबंध घालू नका, बाळासाहेबाप्रमाणे मी जे बोलायचे आहे. ते बोलतोच, असे वक्तव्य टी राजासिंह यांनी यावेळी केले. सभेत बेटी सुरक्षित राष्ट्र सुरक्षित अभियान चित्राचे अनावरण करण्यात आले.

# वाणी भूषण प्रितीसुधाजी यांची गुणानूवाद सभा बावीशी भवनात संपन्न

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** प्रितीसुधाजी म. सा. यांना पुणे येथे १ मे रोजी संथारा (समाधी) सह स्वर्गवास झाला आहे. याशिवाय प. पू. साध्वी आचार्य चंदना श्री यांचा देखील २२ एप्रिल रोजी पुणे येथे संथारासह स्वर्गवास झाला आहे.

महासाध्वी प्रियदर्शनाश्रीजी म. सा. , पूज्य साध्वी विचक्षणाश्रीजी म.सा., पूज्य साध्वी सुकृतिश्रीजी म.सा. आणि पूज्य साध्वी सुप्रज्ञप्तिजी म.सा. यांचे सानिध्यात ही गुणानूवाद ( प्रार्थना)सभा झाली.

श्री वर्धमान स्थानकवासी जैन संघाचे अध्यक्ष कनकभाई शाह यांनी १९९३ साली प्रितीसुधाजी म.सा. यांचा अकोला येथे झालेल्या चातुर्मासाची माहिती देऊन त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. श्री वर्धमान



स्थानकवासी जैन श्रावक संघाचे विश्वस्त आणि भारतीय जैन संघटनेचे प्रा. सुभाष गादीया यांनी प्रितीसुधाजी म. सा. यांचे चातुर्मास दरम्यान मानव धर्म जागविणार्या घडलेल्या घटनांचा आढावा घेतला. यावेळी अशोक कोटेचा यांचे भाषण झाले. त्यांनी प्रितीसुधाजी म. सा. यांनी किल्लारी भूकंपाच्या वेळी स्वहस्ताक्षरात दिलेला संदेश वाचून दाखविला.

प्राण महिला मंडळाने प्रितीसुधाजी म.सा . प्रवचनादरम्यान गात असलेली भजने सादर केली.

पूज्य महासाध्वी प्रियदर्शनाश्रीजी म. सा. यांनी प. पू. प्रितीसुधाजी म. सा. यांच्या आणि आचार्य चंदनाश्रीजी म.सा. यांच्या आचार आणि विचारांची आठवण करून दिली. नरेंद्र भाई गोडा यांनी लोगस्स काउसग्ग व्दारे गुणानूवाद सभेची सांगता केली. या गुणानूवाद सभेचे संचालन शरदभाई दोशी यांनी केले.

# समर्थ पब्लिक स्कूल व जूनियर कॉलेज येथे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** समर्थ पब्लिक स्कूल आणि जुनियर कॉलेज रिधोरा येथे ६६ वा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्रा. नितीनजी बाठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . व राज्य गीत गाण्यात आले.

१ मे १९६० हा महाराष्ट्रातील माणसांचा स्वप्नपूर्तीचा दिवस. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून शिक्षिका दिपाली बेंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले व व हिंदी विभाग प्रमुख घाटे यांनी कामगार दिनाविषयी कविता सादर केली . कार्यक्रमाला उपस्थित संस्थेचे अध्यक्ष नितीनजी बाठे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा देत अमूल्य असे मार्गदर्शन केले. व कामगार दिनाच्या , महाराष्ट्र



दिनाच्या आणि बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

संस्थेच्या संचालिका प्रा. जयश्री बाठे यांनी मार्गदर्शन करताना संबोधले की आजचा दिवस म्हणजे महाराष्ट्र दिन कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमा असा दुग्ध शर्करेचा योग आहे. शाळेचे उप प्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा देत अमूल्य अशा शब्दात संविधानिक बाबींचे महत्त्व सांगितले .कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये संस्थेचे संचालक राजेश बाठे ,मार्गदर्शक जोशी, प्रा. किशोर कोरपे, प्रा. रत्नपारखी, श्री समर्थ आयुर्वेद मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ . आशिष चांडक, शाळेच्या प्राचार्या डॉ. उषालता वानखेडे, उप प्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका वैष्णवी मोहोळ यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षिका मीनाक्षी सोनोने यांनी केले.

# अकोलखेडचा अभय शेगोकार एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी पात्र

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना केले अभिवादन

प्रतिनिधी ४ मे

**अकोट:** भारत सरकारने राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा महाराष्ट्र राज्य पुणे व्दारा आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत अकोटच्या भाऊसाहेब पोटे विद्यालयातील तसेच तालुक्यातील आकोलखेड येथील रहिवासी असलेला अभय दिपक शेगोकार इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्याने सुयश मिळविले. पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी १२ हजार रुपये प्रमाणे एकूण ४८ हजार रुपये एकूण ४ वर्ष शिष्यवृत्ती



मिळणार आहे. अभय दिपक शेगोकार या विद्यार्थ्याने यश मिळाल्यानंतर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. अभय आपल्या यशाचे श्रेय आईवडिल शिक्षक अढाऊ, वर्गशिक्षक संजय गोपनारायण,शिवम लाखंडे यांना देतो.

# बालसंस्कार शिबिराचे उद्घाटन

प्रतिनिधी ४ मे

**अकोट:** संतश्री वासुदेव महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या कुशल नेतृत्वात २० वर्षापासून आयोजित श्री माऊली सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिराचा १ मे रोजी उद्घाटन सोहळा ज्येष्ठ भागवताचार्य श्रीयुत शिवाजी महाराज टाले यांच्या अध्यक्षतेत झाला .यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिर संचालक ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी केले. महाराज म्हणाले, मी स्वतः बाल संस्कार शिबिराच्याच माध्यमातून घडलो. असल्यामुळे कृतज्ञता म्हणून दरवर्षी कार्यक्रमाची कितीही व्यस्तता



असली तरी, श्रीगुरूंच्या आज्ञे मुळे हा संपूर्ण मे महिना बाल संस्काराकरिता आजीवन कायम स्वरूपी राखीव ठेवून या कालखंडात मी व्रतस्थ जीवन जगत असल्यामुळे कृपया माझ्यावर नितांत प्रेम करणाऱ्या भाविक सद्भक्तानी प्रापंचिक तथा पारमार्थिक अशा कुठल्याही कार्यक्रमाकरिता आमच्याकडे या असा आग्रह करून, धर्म संकटात न टाकता आमच्या सार्वजनिक तथा व्यक्तिगत साधनेस सहकार्य करावे असे कळकळीचे आवाहन केले. यावर्षी दुग्ध शर्करा न्यायाने १७ मे असून, पुरुषोत्तम मासाचा योग जुळून येत असल्यामुळे २१ मे ला गुरुपुष्यामृत या त्रिवेणी संगमावर श्रीगुरु ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचा संस्थेच्या संपूर्ण आजी - माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुवर्ण महोत्सव करण्याचे ठरले असून, त्या अंतर्गत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

# कस्तुरीचा 'आत्मजागर' दिमाखदार सोहळा

## जिल्ह्यातील २० निराधार महिलांना शिलाई मशिनचे वाटप

प्रतिनिधी ४ मे

**अकोला:** गायगाव मार्गावर कस्तुरी चॅरिटेबल ट्रस्टच्या परिसरात रविवारी सकाळी आत्मजागर दिमाखदार सोहळा साजरा झाला. जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील २० निराधार महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. महिलांना स्वयंसिद्ध करणे हा मुख्य उद्देश होता

जागतिक कामगार दिन कामगारांच्या उत्थानासाठी व कल्याणासाठी समाजाने जाणीव ठेवून आपण काय करू शकतो याचे चिंतन करण्याचा दिवस आहे असे प्रतिपादन डॉ. हेडगेवार रुग्णालय व अनुसंधान केंद्राचे अध्यक्ष नरेंद्र उपाख्य बाबासाहेब पाठक यांनी केले. ते स्थानिक कस्तुरी संस्थेच्या आत्मजागर' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

एक स्त्री जेव्हा आत्मनिर्भर बनते तेव्हा कुटुंब उभे राहते व व त्यातून समाज उभा राहतो असेही ते पुढे म्हणाले. या उपक्रमांतर्गत समाजातील २० निराधार व गरजू



कामगार महिलांना स्वयंसिद्ध करण्यासाठी कस्तुरीने शिलाई मशीनचे वाटप केले. यात जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त, आकस्मिक आजार व इतर कारणांमुळे मृत्यू पावलेल्या कामगारांच्या पत्नी , परित्यक्ता व गरजू महिला कामगारांचा समावेश होता.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदियाचे अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजश्री कौलखेडे, माजी आमदार वसंतराव खोटरे, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष निकेश गुप्ता, ज्योती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जानोळकर व कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर बुटोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कस्तुरीच्या स्नेही स्व. सौ. स्मिता सतीश बीटोडकर व उपस्थित लाभार्थी महिलांचे दिवंगत पती यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सौ. अपर्णा काळे यांनी यासंदर्भात निवेदन केले. प्रा. नाना भडके यांनी हीच आमुची प्रार्थना अन हेच आमुचे मागणे ही प्रार्थना गायली. कार्यक्रमात मागील वर्षी ट्रॅक्टर ट्रॉली अपघातातील शिवभक्त प्रतीक विनोद काळे यांच्या कृत्रिम पाय रोपण उपचाराकरिता कस्तुरीच्या वतीने प्रा. अनिल मुळे व घनश्याम चांडक यांच्या हस्ते रु.२५०००/- चा धनादेश देण्यात आला. कस्तुरीच्या सदस्या अनिता ईधोळ यांनी या संदर्भात निवेदन केले.

# कुटुंबाची स्व-गणना करण्यासाठी संवादाचा हातभार

प्रतिनिधी ४ मे

**हिवरखेड :** भारतातील सर्वात मोठी जनगणना – २०२६ ही यंदा डिजिटल पद्धतीने पार पडणार असून या उपक्रमात नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी स्थानिक पातळीवर अभिनव प्रयत्न सुरू झाले आहेत. 'संवाद' शालेय अभ्यासिकेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत स्व-गणना व जनजागृतीसाठी 'गृह-भेटी' उपक्रम राबवण्याचा संकल्प महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक संकुलात जाहीर करण्यात आला. या उपक्रमांतर्गत हिवरखेड शहरातील प्रत्येक कुटुंबापर्यंत प्रत्यक्ष भेट देऊन प्रश्नावली, आवश्यक माहिती, मार्गदर्शन तसेच विविध शासकीय सेवांविषयी जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. नागरिकांना डिजिटल जनगणनेबाबत समजून सांगण्यासाठी विद्यार्थी स्वतः पुढाकार घेणार असून यासाठी विशेष वेळ देण्यात येत आहे. 'संवाद' संचालित गुरू-शिष्य अभ्यासिकेच्या माध्यमातून विद्यार्थी शाळेपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष समाजात जाऊन कार्य करत आहेत. कुटुंबांची माहिती समजून घेऊन ती ऑनलाइन पोर्टलवर भरून देण्यास मदत करणे, तसेच स्व-गणनेची प्रक्रिया सुलभ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

# आसेगाव बाजार घरावर निंबाचे झाड कोसळून नुकसान ४ जखमी रुग्णालयात दाखल

प्रतिनिधी ४ मे

**अकोट:** तालुक्यातील आसेगाव बाजार येथे शनिवार २ मे मेला दुपारी साडेचार ते साडेपाच च्या दरम्यान अचानक वादळ सुटल्याने भारत दमोदर प्रेम धांडे यांच्या घरावर निंबाचे झाड कोसळून मोठे नुकसान झाले. प्रेम धांडे यांच्या परिवारातील चार सदस्यांसह इतरांना दुखापत होऊन अकोट ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. राधिका धांडे तिच्या पायाला दुखापत झाली आहे तर पद्मा धांडे, प्रेमदास धांडे, व बयना पाखरे यांना हात-पायाला मुका मार दुखापत झाली आहे ,स्थानिक नागरिकांनी तत्परतेने मदत करून दबलेल्या लोकांना बाहेर काढले, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. विशेष म्हणजे १५/९/२०२१ रोजी

## ग्रामपंचायत भोंगळ कारभार उठला नागरिकांचे जीवावर



निंबाचे झाड धोकादायक असल्याची तक्रार करूनही ग्रामपंचायत आसेगाव बाजार प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. चार-पाच वर्षे दुर्लक्ष केल्यामुळे आज गरीब धांडे कुटुंब उघड्यावर आले असून घरासह बकऱ्यांचेही नुकसान झाले आहे. या प्रकरणात ग्रामपंचायत प्रशासन व जिल्हा परिषद अकोला यांनी तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी तसेच संबंधित ग्रामसेवक व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

माझ्या घरावरील संपूर्ण घरावरील तीन पत्रे सहित शेत उडून गेले आहेत चार तीन गाळ झाले आहेत संडास पडला इतरही मोठे नुकसान झाले त्वरित प्रशासनाने नुकसान भरपाई करण्यात यावे.

**धम्मपाल कृपाकर धांडे**
आसेगाव बाजार नागरिक

धांडे परिवाराच्या जीवितास काही झाल्यास ग्रामपंचायत प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष परवेज खान यांनी दिला आहे. यावेळी गावातील तसेच त्या परिसरातील नागरिकांची ग्रामपंचायत प्रशासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पाच वर्ष अगोदर ग्रामपंचायतला तक्रार दिली होती त्यांनी कोणतीच दखल घेतली नाही मागण्या मान्य न झाल्यास ग्रामपंचायत आसेगाव बाजार व जि. परिषद अकोला कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल.

**राम वासुदेव धांडे**
आसेगाव बाजार, ग्रामस्थ

२/०५/२०२६ ला दुपारी अचानक चक्रीवादळ झाले त्यामुळे प्रेमदास धांडे यांच्या निंबाचे झाड पडून नुकसानीचा पंचनामा करून वरिष्ठांना पाठवण्यात आला आपत्ती व्यवस्थापनाला कळविण्यात आले,

**व्ही. व्ही. भदे**
ग्रामपंचायत अधिकारी
आसेगाव बाजार

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ४ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आर्णीत बनावट ‘एसीबी’ कटाचा भांडाफोड

## पोलीस शिपायाला अडकविणाचा प्रयत्न

प्रतिनिधी ४ मे

**आर्णी :** शहरात एका प्रामाणिक पोलीस शिपायाला खोट्या लाचलुचपत प्रतिबंधक (एसीबी) प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, हा संपूर्ण कट फसला आहे. या प्रकरणामुळे पोलीस वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

एका पोलीस निरीक्षक आणि तथाकथित ‘पांढरपेशी’ कार्यकर्त्यांनी संगनमत करून संबंधित शिपायाविरुद्ध बनावट सापळा रचण्याचा प्रयत्न केला होता. यासाठी एका व्यक्तीला फिर्यादी म्हणून पुढे करून एसीबी कारवाईचा देखावा उभा करण्याची योजना आखण्यात आली होती. मात्र, नियोजित कटाला अनपेक्षित वळण मिळाले. फिर्यादी म्हणून वापरल्या गेलेल्या व्यक्तीनेच पुढे येऊन संपूर्ण योजना उघड केली. त्यामुळे हा डाव पूर्णतः फसला असून, शिपाई बचावला आहे.

दरम्यान, संबंधित पोलीस निरीक्षक यापूर्वीही वादग्रस्त प्रकरणांमुळे चर्चेत राहिले असल्याचे सांगितले जाते.

स्थानिक पातळीवर त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असल्याची चर्चा आहे. तर, दुसरा संशयित व्यक्ती स्वतःला प्रभावशाली व्यक्तींशी जवळीक असल्याचे भासवून नागरिकांवर दबाव टाकत असल्याचा आरोपही होत आहे.

ही बाब वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर दोन्ही संशयितांची चौकशी करून त्यांना समज देण्यात आल्याची माहिती मिळते. या प्रकरणामुळे पोलीस दलातील अंतर्गत शिस्त आणि विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, ज्या शिपायाला लक्ष्य करण्यात आले होते, तो प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ असल्याची चर्चा आहे.

या घटनेमुळे पोलिस दलातील काही अपप्रवृत्तींचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या संदर्भात आर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, यामध्ये वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी सबंधितांचे बयान नोंदविण्याची चर्चा आहे. या प्रकरणात वरिष्ड्ड पोलीस अधिकारी काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पाटणबोरीत वीजेचा लपंडाव; नागरिक त्रस्त

प्रतिनिधी ४ मे

**पाटणबोरी :** तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या पाटणबोरीत वीजपुरवठ्याच्या सतत खंडित होणाऱ्या समस्येमुळे नागरिक हैराण झाले आहेत. पाटणबोरी येथून माथार्जून, अर्ली, पाटण आदी परिसराला वीजपुरवठा केला जात असला, तरी वारंवार लाईन जाणे-येणे (लपंडाव) सुरू असल्याने जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या लग्नसराईचे दिवस आणि वाढते तापमान यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. 28 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 7 वाजता गेलेली वीज तब्बल 5 तासांनंतर रात्री 12 वाजता आली. त्यानंतरही पुन्हा अर्ध्या तासात वीज खंडित होऊन काही वेळानेच सुरू झाली. या प्रकारामुळे लग्नघरी मोठी गैरसोय झाली असून, तयारीसाठी नागरिकांना अतिरिक्त परिश्रम घ्यावे लागले.

या काळात तापमान सुमारे 45 अंशांपर्यंत पोहोचल्याने नागरिकांना उकाडा, अंधार आणि पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागला. दुसऱ्या दिवशी, 29 एप्रिल रोजीही दुपारच्या सुमारास दोन तास वीजपुरवठा खंडित झाला, त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

# बेपत्ता वृद्धेचा शेतात मृतदेह; उष्माघाताचा संशय

## सहा दिवसांपासून शोध सुरू; अखेर दुःखद शेवट

प्रतिनिधी ४ मे

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यातील नवरगाव येथील सहा दिवसांपासून बेपत्ता असलेल्या ८० वर्षीय वृद्ध महिलेचा मृतदेह गावालगतच्या शेतात आढळल्याने खळबळ उडाली. पोमाबाई कवडू शिवरकर असे मृत वृद्धेचे नाव असून, तीव्र उष्माघातामुळे त्यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोमाबाई शिवरकर या मुलगा सतीश शिवरकर यांच्यासोबत राहत होत्या. वृद्धत्व आणि मानसिक आजारामुळे त्या अनेकदा घराबाहेर पडून भटकत असत. २७ एप्रिल रोजी त्या घरातून बाहेर पडल्या; मात्र परत न आल्याने कुटुंबीयांनी दुसऱ्या दिवशी मारेगाव पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती.

दरम्यान, गावालगतच्या शेतात काही ग्रामस्थांना एका महिलेचा मृतदेह आढळला. माहिती मिळताच नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेहाची ओळख पोमाबाई शिवरकर अशी पटली.



घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, कडक उन्हामुळे नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## सावर्जनिक बाधंकाम विभागात महाराष्ट्र दिन व कामगार दिन

प्रतिनिधी ४ मे

**उमरखेड :** स्थानिक सावर्जनिक बाधंकाम विभागात १ मे - महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून शाखा अभियंता खसावत यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.



या कार्यक्रमात कास्ट्राईब कर्मचारी महासंघ अमरावती विभागाचे उपाध्यक्ष डि.जी. पाईकराव, सहायक अभियंते अमन दुर्गिया, घोडेकर, इतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभात शाखा अभियंता खसावत यांनी सर्व कर्मचाऱ्यांना कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर, डि.जी. पाईकराव यांनी महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेच्या विशेष महत्त्वावर भाष्य करत सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी हटकर, टेक्नीशियन लांडगे, सूर्यवंशी, शिपाई पडघने, वाहन चालक संजय उन्हाळे, खानसामा जाधव, शिपाई निहाल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य केले.

## टाकळीत गोठ्याला आग : ६ जनावारांचा मृत्यू; शेती साहित्य खाक

प्रतिनिधी ४ मे

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील टाकळी शिवारात गोठ्याला लागलेल्या आगीमध्ये पाच गायी आणि एका म्हशीचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या आगीत शेतकऱ्याचे ८ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

३ मे २०२६ रोजी दुपारी दोन वाजता टाकळी शिवारातील शेतकरी प्रमोद पुंडलीक कदम यांच्या शेतावर असलेल्या गोठ्यात ही दुर्घटना घडली. गोठ्यात प्लास्टिक कव्हर टाकले होते. उष्णतेच्या तीव्रतेमुळे प्लास्टिकने पेट घेतला. त्यानंतर आग चांगलीच पसरली, ज्यामुळे गोठ्यात बांधलेली पाच गायी, एक म्हैस जळुन मरण पावली. या आगीत केवळ जनावरेच नाही, तर शेतातील हळदीचे बेणे, स्पीक्लर पाईप्स आणि इतर शेतीसाहित्य जळून खाक झाले. एकूण नुकसानीचा प्राथमिक अंदाज आठ लाख चाळीस हजार रुपये वर्तविला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच, गावकऱ्यांनी आग नियंत्रित करण्यासाठी तातडीचे प्रयत्न केले. यामध्ये पोलीस पाटील शंकर हापसे, सरपंचा प्रयाग गंगात्रे, अन्य स्थानिकांनी सहभाग घेतला. यावेळी भा.ज.पा. जिल्हा समन्वयक नीतीन भुतडा यांनी घटनास्थळी धाव घेवून शेतकऱ्याला धीर दिला. यावेळी गोपाल कलाने



आणि पंकज कदम यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## जे.एस.पी.एम. उर्दू ज्युनियर कॉलेजचा शंभर टक्के निकाल

प्रतिनिधी ४ मे

**महागाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, फुलसावंगी यांनी यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत बारावी परीक्षेत शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे. फेब्रुवारी–मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता 12 वी) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला.

कला शाखेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला. कु. तहेरीन फातेमा (81.17 टक्के) हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर शेख फलक (79.50 टक्के) हिने द्वितीय क्रमांक मिळविला. याशिवाय मुजम्मिल खान (78.17), अलमास झोहरा (75), जिक्रा तलत (74.67), आयशा सिद्दीका (73.17), महेरीन जहान (70.50), झेबा नाज (70.17), सुहाना कौसर (69.83), राहीन अंजुम (68.17), मारिया अंजुम (66.33), अलमेरा सैय्यद (63.83), नेहा परवीन (63.17), सुफियान शेख (63), सोहेल खान (62.17), मोहम्मद रेहान (62), शिफा खान (60.83), अर्शिया नाज (60) व अयान खान (60) यांनीही उल्लेखनीय यश मिळविले.

# घरफोडी करणारा आरोपी जेरबंद; दोन गुन्हे उघड

प्रतिनिधी ४ मे

**यवतमाळ :** स्थानिक गुन्हे शाखेने अवधुतवाडी पोलीस ठाणे हद्दीत दिवसा घरफोडी करणाऱ्या एका १९ वर्षीय आरोपीला ताब्यात घेत दोन गुन्ह्यांचा छडा लावला. आरोपीकडून २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उपविभागात घरफोडी, जबरी चोरी व मोटारसायकल चोरीच्या अनुषंगाने पेट्रोलिंग करत असताना खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने विदर्भ हाऊसिंग सोसायटी परिसरात सापळा रचून शेख बिलाल शेख वहाब (वय १९, रा. विदर्भ हाऊसिंग सोसायटी, यवतमाळ) याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली.



मात्र विश्वासात घेऊन विचारपूस केल्यावर त्याने साथीदार फारूख उर्फ मुक्का बशीर खान (रा. इंदिरा नगर, यवतमाळ) याच्या मदतीने दोन दिवसांपूर्वी एका घरात चोरी केल्याची कबुली दिली. तसेच २८ एप्रिल रोजी गोल्डन पार्क परिसरात सिलिंडर व टीव्ही चोरी केल्याचेही सांगितले.

आरोपीच्या अंगझडतीत ५ हजार रुपये रोख रक्कम मिळून आली. त्याच्याकडून पुढील तपासात चोरीचा सिलिंडर व टीव्ही असा सुमारे १५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी अवधुतवाडी पोलीस ठाण्यात आधीच गुन्हे नोंद असून, त्याची पडताळणी करण्यात आली. एकूण २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीला पुढील कारवाईसाठी अवधुतवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## पुसदमध्ये सत्कार समारंभ

प्रतिनिधी ४ मे

**पुसद :** हाजी अख्तर खान अभ्यासिका केंद्र, पुसद येथील विद्यार्थ्याने महाराष्ट्र पोलीस भरतीत सिपाही पद मिळवून यश संपादन केल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यासह त्याच्या पालकांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हाजी कौसर खान होते. सत्कारमूर्ती म्हणून शेख आफताब शेख मुश्ताक यांचा विशेष गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून हाजी जमीर अहमद, माजी मुख्याध्यापक मुश्ताक अली अहमद अली, मोहम्मद सईद अब्दुल सत्तार आणि अब्दुल सत्तार वली मोहम्मद उपस्थित होते. तसेच मधुकर नगर येथील समाजसेवक वाजीद खान जोरावर खान यांनीही उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्याचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. परिश्रम, शिस्त आणि सातत्याच्या बळावर कोणतेही यश मिळविता येते, असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रहमत खान अहमद खान यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गावंडे महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी ४ मे

**उमरखेड :** स्थानिक गोपिकाबाई सीताराम गावंडे कनिष्ठ महाविद्यालय, उमरखेड येथील बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून महाविद्यालयाने यंदाही ९८ टक्के निकाल देत जिल्ह्यात अव्वल स्थान कायम राखले आहे. उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावतीच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत हा उल्लेखनीय यश संपादन करण्यात आले.

कला शाखेत कु. योगेश्वरी प्रदीप केळापुरे हिने ९१.१७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून कु. प्राजक्ता अनंता काळबांडे हिला ८६.३३ टक्के गुण मिळाले. विज्ञान शाखेतही १०० टक्के निकाल लागला असून श्रेयश दत्तात्रय सुने याने ८८ टक्के गुणांसह प्रथम स्थान मिळवले.



एचएससी व्होकेशनल शाखेत कु. जयश्री कुंडलिक मेंडके हिने ७६.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे.

विदर्भाच्या शेवटच्या टोकावर असलेल्या या महाविद्यालयात ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षण घेत असूनही सातत्याने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखण्यात यश मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक व कर्मचारीवृंद सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर, सचिव डॉ. या. मा. राऊत, संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. माधवराव कदम, उपप्राचार्य प्रा. लाभशेटवार, पर्यवेक्षक प्रा. जाधव तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

# आर्णीत जनगणना प्रगणक–पर्यवेक्षक प्रशिक्षणाला सुरुवात

प्रतिनिधी ४ मे

**आर्णी :** संपूर्ण भारतामध्ये जनगणना २०२७ दोन टप्प्यांत होणार असून, महाराष्ट्रात या प्रक्रियेची सुरुवात १ मेपासून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आर्णी शहरात जनगणना कामासाठी प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण आजपासून सुरू झाले आहे.


जनगणना प्रक्रियेअंतर्गत १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांनी स्वतःची स्व-गणना करायची आहे. त्यानंतर १६ मे ते १५ जून दरम्यान प्रगणक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत.



आर्णी शहरातील जनगणना सुरळीत पार पडावी यासाठी मुख्याधिकारी श्री. रवींद्र राऊत यांची चार्ज ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ५५ प्रगणक, ८ पर्यवेक्षक, १ वरिष्ठ लिपिक आणि १ ऑपरेटर यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रशिक्षणाचा पहिला टप्पा म. द. भारती विद्यालय, गांधीनगर आर्णी येथे सुरू झाला असून तो ३ ते ८ मे या कालावधीत दोन बॅचेसमध्ये पार पडणार आहे. या प्रशिक्षणासाठी फील्ड ट्रेनर म्हणून कोषटवार, पवार मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षण उद्घाटनप्रसंगी प्रशासन अधिकारी सचिन तिरपुडे, कार्यालयीन अधिक्षक अर्शद शेख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते फील्ड ट्रेनर्सचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी जनगणनेचे काम अचूक व सुरळीत पार पडेल, असा विश्वास व्यक्त करत सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांना शुभेच्छा देण्यात आल्या. या संपूर्ण प्रशिक्षण व नियोजन प्रक्रियेत अजय चंदेल, यश वानखेडे, नितीन लातूरकर आणि सलमान शेख यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

# मातोश्री विद्यालयाचा एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट निकाल



प्रतिनिधी ४ मे

**महागाव :** 2026 मध्ये झालेल्या फेब्रुवारी/मार्च एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत महागाव येथील मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालयाने शानदार यश संपादन करत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल 100 टक्के लागला असून, कला शाखेचा निकाल 98.14 टक्के आणि इंग्रजी माध्यम विज्ञान शाखेचा निकाल 99.16 टक्के लागला आहे.

एकूण 285 विद्यार्थी बोर्ड परीक्षेस उपस्थित झाले होते, त्यापैकी 101 विद्यार्थी विशेष प्राविण्यासह आणि 134 विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यामध्ये विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी दाखवली आहे. विज्ञान शाखेत, कु. सानिका अविनाश राठोड हिने 92.67 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. समृद्धी किशोर ठाकरे (92.00%) हिने द्वितीय तर कु. पल्लवी बालाजी केंद्रे (87.00%) हिने तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेत, कु. संचित गजानन बसवते हिने 76.67 टक्के गुणांसह प्रथम स्थान मिळवले. कु. श्रद्धा संजू अढागळे (75.67%) हिने द्वितीय तर कु. किरण विनोद राठोड (74.33%) हिने तृतीय क्रमांक मिळवला. इंग्रजी माध्यम विज्ञान शाखेत, शिवांग विकास मुलंगे (89.00%) प्रथम, कु. अदिती परमेश्वर बिरादार (88.83%) द्वितीय तर कु. वैदेही सुधीर भांगे (88.33%) तृतीय ठरली.

सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे. संस्थापक श्री. डी. पी. जगताप यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा स्त्री रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदभरतीला तांत्रिक स्थगिती

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (MSACS), मुंबई अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथील आयसीटीसी केंद्रातील रिक्त 'प्रयोगशाळा तंत्रज्ञ' पद भरती प्रक्रियेला तांत्रिक कारणास्तव पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी एका पत्रकाव्दारे कळविले आहे. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेशानुसार, काही अपरिहार्य तांत्रिक कारणांमुळे ही रिक्त पदे भरण्यास स्थगिती देण्यात आली असून भरती प्रक्रिया तात्काळ थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार ही कार्यवाही होत आहे. यापूर्वी या रिक्त पदाच्या भरतीसाठी परवानगी देण्यात आली होती, मात्र आता प्रशासकीय कारणास्तव ही प्रक्रिया थांबवण्यात आली आहे. तरी संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्राने प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.



## लाकूड बाजारात भिषण आग; लाखोचे फर्निचर जळून खाक

प्रतिनिधी ४ मे

**परतवाडा:** शहरातील गजबजलेल्या लक्कड बाजार परिसरात आज अचानक लागलेल्या भीषण आगीत दोन ते तीन दुकाने जळून खाक झाली आहेत. प्राथमिक अंदाजानुसार, विद्युत शॉर्ट सर्किटमुळे (विद्युत घर्षण) ही आग लागली असून, यामध्ये व्यापाऱ्यांचा लाखो रुपयांचा माल जळून खाक झाला आहे. मात्र स्थानिक युवकांच्या मदतीमुळे मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्कड बाजार परिसरात अचानक धुराचे लोट दिसू लागले आणि काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले. लाकूड आणि ज्वलनशील पदार्थांची उपस्थिती असल्याने आग वेगाने पसरली. आगीची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली होती.

आगीची भीषणता पाहून तातडीने अचलपूर, चांदूर बाजार आणि अंजनगाव सुर्जी येथील नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. एकामागोमाग एक दाखल झालेल्या अग्निशमन बंबांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.स्थानिक युवकांनी वाचवले मोठे नुकसान ही आग विझवण्यात स्थानिक युवकांचे मोठे योगदान राहिले. प्रशासकीय यंत्रणा पोहोचण्यापूर्वी आणि दरम्यानच्या काळात स्थानिक युवकांनी जीवाची पर्वा न करता मदतीसाठी धाव घेतली. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि धाडसामुळे आग शेजारील इतर दुकानांपर्यंत पोहोचण्यापासून रोखण्यात यश आले, अन्यथा नुकसानीचा आकडा मोठा झाला असता. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात आले असून सध्या 'कुलिंग ऑपरेशन' सुरू आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही, परंतु व्यापाऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

## अमरावती जिल्हा युवक काँग्रेसला उत्तम कामगीरी केल्याबद्दल महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट जिल्हा सन्मानीत



प्रतिनिधी ४ मे

**अमरावती :** भारतीय युवक काँग्रेसचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे व भारतीय युवक काँग्रेस सहसचिव व महाराष्ट्र सहप्रभारी शाम्भवी शुक्ला जी यांच्या प्रमुख उपस्थितीत टिळक भवन, मुंबई येथे सम्मानित करण्यात आले. यावेळी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी हा सम्मान आम्हाला सहकार्य करनारे जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ नेते, युवक काँग्रेस प्रदेश पदाधिकारी, विधानसभा अध्यक्ष, तालुका अध्यक्ष व सर्व जिल्ह्यातील युवक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा असल्याचे सांगीतले यावेळी राहुल येवले जिल्हाध्यक्ष कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगले ,प्रदेश महासचिव रीतेश पांडव, परीक्षित जगताप , निलेश गुहे , राधिका देशमुख , ,नितिन काले ,विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख ,आशीष यादव व महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिनी वेगळ्या विदर्भाची मागणी

प्रतिनिधी ४ मे

**अमरावती :** १ मे १९६० विदर्भ महाराष्ट्रात जबरदस्तीने जनतेची मागणी नसताना समाविष्ट केल्यानंतर विदर्भातील औद्योगिक नष्ट. करण्यात आले.

नव्याने औद्योगीकरण महाराष्ट्राने येऊ दिले नाही त्याचा परिणाम सध्याची प्रचंड प्रमाणात वाढलेली बेकारी हा आहे. मुंबई ,पुणे ,नासिक, ठाणे जणूकाही महाराष्ट्र त्यांच्या समस्या म्हणजे उभ्या महाराष्ट्राच्या समस्या असे गृहीत धरून योजना तयार करण्यात आल्या व विदर्भाकडे दुर्लक्ष करण्यात आले. विदर्भाच्या नैसर्गिक संसाधनाचा पद्धतशीर उपयोग करून संपत्ती मात्र उर्वरित महाराष्ट्रात निर्माण करण्यात आली. संपत्ती बरोबर मनुष्यबळ जाणारच परिणामी विदर्भातील एक खासदार व चार आमदार कमी झाले.




केंद्र सरकारने विदर्भाच्या मागणीला सतत दुर्लक्ष केल्यामुळे त्याचे परिणाम विदर्भ भौगतो आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या व वाढत्या बेरोजगारीने विदर्भ ग्रासलेला आहे. तेव्हा अनुच्छेद तीन नुसार वेगळा विदर्भ देण्यात यावा अशी मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली. शहराध्यक्ष रियाज खान व महिला अध्यक्षा सुषमा मुळे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या महिला अध्यक्षा रंजना मामर्डे व पश्चिम विदर्भ प्रमुख पी आर राजपूत व कमिटी सदस्य प्रकाश लढ्ढा यावेळी उपस्थित होते. पश्चिम विदर्भ सोशल मीडिया प्रमुख संकेत चौधरी, पद्मा राजपूत, पांडुरंग बिजवे ,अनिल वानखडे, सतीश प्रेमलवार , अफसर भाई, अशोक हांडे, प्राध्यापक शरद पुसदकर ,डॉक्टर विजय कुबडे, साहेबराव इंगळे, जीवन पचगाडे, अशोकराव राणे यांनीही आंदोलनात सहभाग घेतला.

## दर्यापूर शहरातील वीज समस्यांच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी !

### ◆ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, दर्यापूरतर्फे आ. संजय खोडके यांना निवेदन

प्रतिनिधी ४ मे

**दर्यापूर :** दर्यापूर शहरातील वीज पुरवठा अलीकडील काळात वारंवार खंडित होत असून, ट्रिपिंगच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. परिणामी नागरिकांना तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयांना दैनंदिन कामकाजात अडचणींचा सामना करावा लागत आहे. सदर बाबीच्या अनुषंगाने दिनांक ०१ मे २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, दर्यापूर तर्फे मा. आ. संजय खोडके साहेब, सदस्य विधान परिषद, महाराष्ट्र राज्य यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, दर्यापूर शहराचा वीज पुरवठा गायवाडी येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रावर अवलंबून असून,



संबंधित वीज वाहिनीवर वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. सदर परिस्थितीचा परिणाम शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, आरोग्य सेवा केंद्रे तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे.

तसेच, गायवाडी येथील ३३ केव्ही उपकेंद्रावरील वीज व्यवस्था सुमारे ३० ते ३५ वर्षे जुनी झालेली असून तिची दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे वीज पुरवठा सुरळीत व अखंडित ठेवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे अत्यावश्यक ठरत आहे.

सदर अनुषंगाने पुढीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत:

दर्यापूर शहरासाठी १३२ के.व्ही. किंवा पर्यायी ३३ के.व्ही. बॅकअप वीज लाईन उपलब्ध करून देण्यात यावी.

विद्यमान जुन्या वीज वाहिन्यांची दुरुस्ती करून आवश्यक त्या ठिकाणी नवीन विद्युत खांब उभारण्यात यावेत.

वरील कामांसाठी जिल्हा नियोजन समिती (अइअ्ण्) अंतर्गत आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी.

यापूर्वीही सदर विषयासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले असून, संबंधित बाब विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली आहे. तथापि, अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्यामुळे जिल्हा नियोजन समिती (अइअ्ण्) अंतर्गत आवश्यक निधीची तातडीने तरतूद करून वीज समस्येचे निराकरण करण्यात यावे, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे.

यावेळी सरपंच महासंघाचे अध्यक्ष प्रमोद सांगोले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अमोल गहरवार, गटनेता दिनेश पारडे , नगरसेवक राहुल बेताळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हासरचीटनिस कुलदीप काळे, अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष शेख अनिस, युवक अध्यक्ष नितीन गावंडे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष शुभम होले, निलेश डालके, गजानन सोळंके, धीरज बयस, सागर काळे, तुषार कडू, युवक शराध्यक्ष प्रतीक नाकट, योगेश हिंगणकर, सुधीर येवतकर, मोहन अंभोरे, विनोद खाडे, निलेश बयस, गजानन मानकर, गजानन सोळंके, आतिश बयस उमेश शेवणे व इतर पदाधिकारी.

## आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

प्रतिनिधी ४ मे

**दर्यापूर :** ग्रामीण भागात शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्यरत असलेल्या आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूरने यंदाही बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ९९.१७ टक्के असा भव्य निकाल नोंदविला आहे.

सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीच्या जोरावर विद्यालयाने आपल्या उज्ज्वल निकाल परंपरेला यंदाही साजेशी अशीच भर घातली आहे.

या परीक्षेत कु. श्रद्धा संतोषराव नांदुरकर हिने ८९.१७ टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. अक्षदा पंकज टोळे हिने द्वितीय क्रमांक मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली, तर संचित नरेंद्र गुल्हाने याने तृतीय क्रमांक मिळवत यशाची परंपरा पुढे नेली. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कठोर परिश्रम, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले



असून त्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक लौकिकात भर पडली आहे.

या यशस्वी निकालानिमित्त विद्यालयात एक छोटेखानी परंतु उत्साहपूर्ण सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. केशवरावजी गावंडे साहेब कार्यकारणी सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती उपस्थित होते. यावेळी ज्ञानदेवरावजी घाटे आजीवन सदस्य श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, पंजाबरावजी म्हाला आजीवन सदस्य शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, विनायक रावजी गावंडे शाळा निरीक्षक श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, मुख्याध्यापक मनोज देशमुख, उपमुख्याध्यापक शैलेश ठाकरे, शिक्षक प्रतिनिधी अनिल भारसाकळे, शिक्षकेतर प्रतिनिधी प्रदीपभाऊ भारसाकळे, प्रदीप काळे तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्रशांत गावंडे सर आणि संपूर्ण कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकवृंद उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. केशवरावजी गावंडे यांनी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे कौतुक करताना सांगितले की बारावीच्या उत्कृष्ट निकालाने केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे तर संपूर्ण विद्यालयाची शैक्षणिक परंपरा उज्ज्वल झाली आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या या प्रवासात जिद्दीने केलेली मेहनत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पाया ठरणार आहे. शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रेरणा आणि संस्थेचे सक्षम प्रशासकीय नेतृत्व यामुळेच विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेचा सर्वोत्तम उपयोग करता आला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या यशामागील शिक्षकांच्या योगदानालाही विशेष अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. भविष्यातही अशीच उज्ज्वल यशाची परंपरा कायम राहून विद्यालय नव्या उंचीवर पोहोचावे, अशी आशावादी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## पारधी समाजाच्या व्यक्तींसाठी विविध योजना; अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ४ मे

**अमरावती:** धारणी एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प कार्यक्षेत्रांतर्गत पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या पारधी समाजाच्या अर्जदारांकडून योजनांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

या योजनांचे विनामूल्य अर्ज वाटप व स्विकृती शासकीय आश्रमशाळा (गुल्लरघाट) कॅम्प, बाभळी ,दर्यापूर, एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प, धारणी अंतर्गत सहायक प्रकल्प अधिकारी कार्यालय मोर्शी, उपकार्यालय, अपर आयुक्त कार्यालय अमरावती व प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी येथे सुरू आहे. पारधी समाजाच्या अर्जदारांनी परिपूर्ण कागदपत्रांसह भरलेला अर्ज दिनांक ५ मे २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्राप्त होणा-या अर्जाची छाननी करून समितीमार्फत अर्जदारांची अंतिम लाभार्थी निवड करण्यात येईल. अधिक माहितीसाठी या कार्यालयातील विकास शाखेशी तसेच दुरध्वनी क्रमांक ०७२२६-२२४२१७ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे योजनांचा लाभ दिला जातो. पीठ गिरणी पुरवठा करणे, शुटिंग कॅमेरा पुरवठा करणे, शिलाई मशिन खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, पारधी समाजाच्या बचत गटांना विहीर खोदकाम करण्यासाठी क्रेन मशिन पुरवठा अर्थसहाय्य करणे, पारधी समाजाच्या बचतगटांना मंडप साहित्य खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे.


## Walk in Interview

**Late. Janabai Thakare Bahuuddeshiya Sanstha Mangrulpir**
**Pratibha Primary English School Mangrulpir Dist Washim**

Applications are invited for Trained & Experienced Candidates for the following posts

**(Non-grant Basis)**

| Sr.No | Name Of Post | Educational Qualification | No Of Post |
|---|---|---|---|
| 1 | PRINCIPAL | MA/M.SC. B.Ed. with 5 Years Principal/ Teaching experience (English Medium School) | 01 |
| 2 | Asst. Teacher | M.Sc./B.Sc.B.Ed (Math, Physic. Biology) | 03 |
| 3 | Asst. Teacher | B.A./M.A. B.Ed. (English, SST,Hindi) | 04 |
| 4 | Asst. Teacher | B.A./B.Sc. D.Ed./B.Ed. | 02 |
| 5 | Asst. Teacher | B.A. B.Ed. Psychology | 01 |
| 6 | Asst. Teacher | Any Graduate with Montessori diploma | 04 |
| 7 | Computer Teacher | B.Sc./M.Sc. B.Ed. Computer Science/B.CA | 02 |
| 8 | Art/Craft Teacher | ATD/GD Art /BFA | 02 |
| 10 | Sport Teacher | B.Ped/ M.Ped | 02 |
| 14 | Peon/Sweeper | 9th Pass | 05 |

**For For Teachers post**

1. Minimum Experience two years in any reputed English medium school.
2. Fluency in English &Computer knowledge is essential.
3. Salary commensurate with qualification & experience.
4. Candidate should bring an application, resume, original document with one set of photo copies at the time of interview.
5. No T.A/D.A. Allowance

**Interview will be held on :- 09/05/2026 at 11.00 am**

**Interview Place :Yashwantrao Chavan Shaikshnik Sankul Washim Road, Mangrulpir Dist. Washim (M.S.)**
**Contact No. 9822215408, 7773996256**

**President/Secretary**


## ग्राहकांच्या समाधानासाठी काम करा- मुख्य अभियंता, अशोक साळुंके

### ◆ परिमंडळातील ५० तांत्रिक कर्मचारी ◆ गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी ४ मे

**अमरावती:** महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनांनिमित्त महावितरणच्या अमरावती परिमंडळातील ८ यंत्रचालक आणि ४२ तंत्रज्ञ अश्या ५० कर्मचाऱ्यांना गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्युत भवन येथे झेंडा वंदन झाल्यानंतर मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्याहस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

नियोजन भवन ,जिल्हाधिकारी कार्यालय येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी अधीक्षक अभियंता प्रविण दरोली, अधीक्षक अभियंता (प्र) प्रफुल्ल लांडे, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख,



कार्यकारी अभियंते राजेश लांडे, प्रदिप अंधारे, राजेश माहुलकर, प्रणाली विश्लेषक नितिन नांदुरकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक शिरीष शहा यांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना मुख्य अभियंता म्हणाले,की वीज ही अत्यावश्यक सेवा आहे, त्यामुळे ग्राहकाचे समाधानासाठी काम करा, पेरले ते उगवते या उक्तीप्रमाणे दर्जेदार सेवा दिली तर ग्राहकही आपला निश्चित सन्मान करणार, तक्रार शुन्य कार्यलय हा उद्देश समोर ठेवून सर्वांनी सामुहिक प्रयत्न करावे. यासोबत आपला कार्यालय स्वच्छ ठेवून वृक्षारोपण आणि संवर्धनाची परिमंडळ कार्यालयाने सुरू केलेल्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

यावेळी बोलतांना अधीक्षक अभियंता प्रविण दरोली (यवतमाळ) म्हणाले की, खाकी गणवेश ही महावितरणची ओळख असून तो सर्वांनी आवर्जून घालावा, अधीक्षक अभियंता (प्रभारी ,अमरावती) प्रफुल्ल लांडे म्हणाले की गुणवंत पुरस्कार हा कर्मचाऱ्यांने वर्षभर आणि सात्यतपूर्ण केलेल्या कामाचा सन्मान आहे. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांनी यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

परिमंडळातील ५० पुरस्कारात अमरावती जिल्ह्यातील २७ गुणवंत कामागाराचा समावेश असून यात ४ यंत्रचालक आणि २३ तंत्रज्ञ आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील यात ४ यंत्रचालक आणि १९ तंत्रज्ञ अश्या एकुण २३ गुणवंत कामगाराचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांनी केले, कार्यक्रमाला एका सुत्रात बांधण्याचे काम व्यवस्थापक वित्त व लेखा विकास बांबल आणि विधी अधिकारी आद्यश्री कांबे यांनी केले, तर आभार प्रणाली विश्लेषक नितीन नांदुरकर यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि ४ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

पेयजल योजनेचा महाघोटाळा....

# जीवन प्राधिकरणचे करोडो रूपये 'पाण्यात'!

## * योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायचा कशाला?

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

ग्रामीण भागात जनतेला स्वच्छ पाणी देण्यासाठी शासनाच्यावतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या वतीने पेयजल योजना राबविण्यात येत आहे. मात्र ४० वर्षापासून वाशीम जिल्ह्यातील करोडो रूपये खर्च करून उभारलेल्या नळ योजनेतून अद्यापही जिल्ह्यातील कोणत्याच गावात पाणी पुरवठा सुरू झाला नसल्याचे चित्र आहे. ज्या गावात सुरू झाला त्या गावात मात्र कागदोपत्री दाखविण्यात आला आहे. त्यामुळे शासनाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे विभागाचे शेकडो करोडो रूपये तीन वेळा निधी येवूनही 'पाण्यात' गेले आहेत. या विभागात अधिकारी व ठेकेदाराच्या संगणमताने करोडो रूपयाचा महाघोटाळा झाला असून ही योजना सुरू नसतांनाही ग्रामपंचायतीकडून कर वसूली मात्र कशासाठी केल्या जाते असा प्रश्न जनतेला पडला आहे. आता ह्याच योजना जलजीवन मिशनच्या नावाखाली पुन्हा सुरू करण्याऐवजी भ्रष्टाचाराच केल्या जात आहे.फक्त कारंजा शहरातच जलजीवन मिशनची नळ योजना सुरू आहे.




शासनाच्या वतीने ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी जीवन प्राधिकरणची स्थापना करण्यात आली. मात्र या विभागातील अधिकारी व ठेकेदारांनी वाशीम जिल्ह्यात स्वातंत्र्य काळापासून राबविण्यात आलेल्या योजनेत अंतर्गत एकाही गावात प्रत्यक्षात पाणी पुरवठा केला नाही. भ्रष्टाचाराची वाळवी लागलेल्या ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी संपूर्ण योजनाच हडप केली. लाखो रूपये पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेकडून मात्र कर वसूली केली. प्रत्यक्षात मात्र कुठेही पाणी पुरवठा केला नाही. आता या भ्रष्टाचारावर पडदा टाकण्यासाठी या योजनेचे पुनरूज्जीवन करून मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनेला शेकडो करोडो रूपयाचा निधी तीन वेळा प्राप्त झाले आहेत. या नळयोजना चालू करण्यासाठी सोलर पंपही बसविण्यात येणार आहे. आधिच्याच करोडो रूपयाचा घोटाळा करून सुरू न केलेल्या अर्धवट अवस्थेत असलेल्या ग्रामीण भागाच्या नळयोजना पुन्हा नव्याने सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून निधी देण्यात आला. मात्र भ्रष्टाचाराने पोखरून टाकलेल्या अधिकारी व ठेकेदारांना आता जुन्या भ्रष्टाचारावर नवीन भ्रष्टाचार करायला संधी मिळणार आहे. अगोदरच करोडो रूपये खर्च करूनही कधीही न सुरू झालेली नळयोजना कागदोपत्री सुरू दाखविली होती. किंवा खाजगी नळयोजना ग्रामपंचायतीला हाताशी धरून आपली नळयोजना सुरू असल्याचे दाखविले आहे. आता ह्याच जुन्या नळयोजना जलजीवन मिशनच्या नावाखाली थातुरमातूर सुरू करून पुन्हा अधिकारी व ठेकेदार महाघोटाळ करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे हक्काचे पाणी जनतेपर्यंत पोहोचल किंवा नाही याची श्वाश्वती देता येत नाही. त्यामुळे जुनी नळयोजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा किंवा जनतेनी आता पाण्यासाठी पेटून उठायची गरज आहे. काही अधिकाऱ्यांनी या संबंधि विचारणा केली असता बंद पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडे वळत्या करण्याची विनंती केली होती. मात्र त्या जिल्हा परिषदेने स्वीकारली नाही. तर योजना जिल्हा परिषदेला द्यायची असेल तर मग अधिकाऱ्यांना पगार कशाचा द्यायचा असा प्रश्न पडतो. अधिकारी व ठेकेदार योजनेत भ्रष्टाचार करून हडप करण्यासाठीच असतात काय? असा प्रश्न सर्व सामान्य जनतेला पडला आहे. त्यामुळे ह्या योजना सुरू करण्यासाठी गाव पातळीवर पाणी द्या अन्यथा पाणी पेटवा आंदोलन उभारण्याची गरज आहे.

**तीन वेळा आला शेकडो कोटीचा निधी**

**कागदोपत्रीच योजनेचा केला विधी**

**आता जलजीवन मिशनच आधी**

### जिल्ह्यातील ५६ गावात पाणी पोहोचलेच नाही

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या वतीने जिल्ह्यात ५६ गावासह काही शहरात कागदोपत्री पाणी पुरवठा केल्या जातो. मात्र प्रत्यक्षात कोणाच्याच नळाला पाणी आले नाही. ज्या गावात पाणी पुरवठा होतो. तो खाजगी नळयोजनेद्वारे होतो. खाजगी नळयोजनेलाच आपली नळयोजना दाखवून करोडो रूपयाचा भ्रष्टाचार अधिकारी व ठेकेदारांनी केला आहे. आता पुन्हा भ्रष्टाचार करण्यासाठी हीच योजना बंद दाखवून करोडो रूपयाचा निधी हडपण्याच्या तयारीत अधिकारी व ठेकेदार आहेत.

### नळयोजना सुरू दाखवा; बक्षीस मिळवा !

ग्रामीण भागात अनेक वर्षापासून जीवन प्राधिकरणाची नळयोजनाची कामे झाली काही कामे पुर्ण तर काही कामे अर्धवट आहेत. तर नळयोजनाही प्रत्यक्षात केंव्हाच सुरू झाली नाही. जनतेला हक्काचे पाणी मिळाले नाही. म्हणून जनतेनी आता जीवन प्राधिकरण विभागाच्या नळयोजना सुरू दाखवा व बक्षीस मिळवा असा सूर निघत आहे. अधिकारी फक्त ठेकेदारांना जगविण्यासाठीच पगार घेत असल्याचे सिध्द होत आहे.

### पाणी पेटवा आंदोलन झाले पाहिजे

जनतेनी हक्काचे पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी आंदोलन करून रस्त्यावर येण्याची गरज आहे. करोडो रूपये खर्च करून उभारलेल्या पाण्याची टाकी, इमारत, पाईपलाईन आजपर्यंत निकामी झाली आहे. ह्या योजना सुरू करण्यासाठी दोन वेळा शेकडो कोटी निधी आला. मात्र त्याचा कागदोपत्रीच विधी झाला. आता ह्याच योजना जलजीवन मिशनच्या नावाने पुन्हा टाकून नव्याने भ्रष्टाचार करण्यासाठी अधिकारी ठेकेदार पुढारी सज्ज झाले आहेत. त्यांना धडा शिकविण्यासाठी प्रत्येक गावातून पाणी पेटवा आंदोलन झाले पाहिजे.


### जीवन प्राधिकरणचे कार्यालय कशासाठी

मोठा तामझाम करून करोडो रूपये खर्चून जनतेला हक्काचे पाणी आजपर्यंत हा विभाग देवू शकला नाही. म्हणून या कार्यालयाचे काम काय व कार्यालय कशासाठी असा प्रश्न सर्व सामान्यांना पडला आहे. अधिकारी पगार घेवूनही काम करत नाहीत. जनतेला पाणी देत नाही त्यामुळे आता नागरिकांनी जागृत होवून अधिकाऱ्यासह ठेकेदारांना, पुढाऱ्यांना प्रश्न विचारण्याची गरज आहे.

---

## थोडक्यात

### कारंजा शहरातील मेमन कॉलनी येथे मोठी चोरी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

कारंजा शहरातील मेमन कॉलनी येथे दि.३ मे रोजी रात्री चोरीची घटना घडली असून चोरट्यांनी सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने आणि अंदाजे ५० हजार रुपयांची रोकड लंपास केली.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक शहर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन तपासाला सुरुवात केली आहे.या प्रकरणात कारंजा पोलीस ठाण्याचे ठाणेदार दिनेश शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली ए.पी.आय पवार,पो.उप.नि.गणेश जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी मनीष तिवारी,उमेश कुमार बीबकर,मोहम्मद परसुवाले,अनिस निमसुरवाले,अमित भगत व नितीन पाटील हे कर्मचारी तपास करीत आहे या घटनेमुळे कारंजा शहरांमध्ये व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### महाबीजकडून नव्याने विकसित दर्जेदार उत्पादनांचे लोकार्पण



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाबीजच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केवळ दर्जेदार बियाणेच नव्हे, तर सेंद्रिय शेती, मातीची सुपीकता वाढविणारी उत्पादने आणि आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे हे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. नव्याने विकसित करण्यात आलेली निमास्त्र, महास्पीड, महाबीज कर्बमापक व आर.व्ही.एस.एम. २०११-३५ ही उत्पादने शेतकऱ्यांच्या उत्पादनवाढीसोबतच खर्चात बचत करून शेती अधिक समृद्ध करण्यास हातभार लावतील. अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.


महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज) यांनी शेतकऱ्यांच्या उत्पादनवाढीबरोबरच सेंद्रिय, शाश्वत आणि आधुनिक शेतीला चालना देण्यासाठी नव्याने विकसित केलेल्या विविध उत्पादनांचे लोकार्पण कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. महाबीजच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त महाबीजने नाविन्यपूर्ण अशी चार नवी उत्पादने विकसित केली आहेत. यामध्ये सेंद्रिय कीडनियंत्रण, जलद कचरा व्यवस्थापन, माती परीक्षण तसेच उच्च उत्पादनक्षम सोयाबीन वाणांचा समावेश आहे.कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाबीजने प्रथमच अशा प्रकारची चार नाविन्यपूर्ण उत्पादने विकसित करून नवा इतिहास घडविला आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे कृषी विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत महाबीजला खाजगी कंपन्यांच्या स्पर्धेत सक्षमपणे उभे केले आहे. २ मेपासून ही उत्पादने शेतकऱ्यांसाठी बाजारात उपलब्ध होणार आहेत.

---

## वाशीम मध्ये खतांच्या बेकायदेशीर विक्रीवर कारवाई

### चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



वाशिम मध्ये खतांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर कृषि विभागाच्या पथकाने धडक कारवाई केली. कारवाईत ४ जणांवर शहर पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले असून कृषि विभागाने केलेल्या या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे.

वाशिममध्ये अनुदानित ग्रेड खतांची ई-पॉस प्रणालीविना ऑफलाईन विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकानं धाड टाकून कारवाई केली आहे .या प्रकरणी चार जणांविरुद्ध वाशिम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे ,वाशिम परिसरात नियमबाह्य पद्धतीने खतांची विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती कृषी विभागाला मिळाली होती. त्यावरून कृषी विकास अधिकारी अभिजित देवगिरकर यांच्या पथकानं तपासणी करून ही कारवाई केली आहे.या प्रकरणी ज्ञानेश्वर देवळे. वाशिम, मनोज कोरतकर रा. बारामती ,अमोल राठोड व पूजा राठोड रा. निमगाव केतकी बारामती यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.बेकायदेशीर खत विक्रीविरोधात पुढेही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे

### शेतकऱ्यांचे लुटारू सक्रीय

बोगस बियाणे तथा बनावट रासायणीक खते शेतकऱ्यांच्या माथी मारणारी टोळी जिल्ह्यात सक्रीय झाली असून कृषी विभागाच्या कारवाईमुळे सिध्द झाले आहेत. दरवर्षी पेरणीपुर्वी शेतकऱ्यांना लूटण्यासाठी बोगस बियाणे बनावट रासायणीक खते विकणारी टोळी सक्रीय होते.

---

## जिल्ह्यात पाणीटंचाई व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज !



### ३३ उपाययोजना कार्यान्वित चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा चारा सुरक्षा आराखडा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



जिल्ह्यात वाढते तापमान व संभाव्य पाणीटंचाईची स्थिती लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन करत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली असून, टंचाईग्रस्त भागांवर सूक्ष्म पातळीवर लक्ष ठेवले जात आहे.

दि. ३० एप्रिल २०२६ रोजीच्या अहवालानुसार, सन २०२५-२०२६ या कालावधीसाठी जिल्ह्यात एकूण ३१७ उपाययोजना मंजूर करण्यात आल्या असून त्यासाठी सुमारे ३०६ लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.सध्या ३३ उपाययोजना प्रत्यक्ष राबविण्यात येत असून त्यावर १५८ लक्ष रुपये खर्च करण्यात येत आहेत. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विहीर अधिग्रहण, टँकरद्वारे पाणीपुरवठा, नळयोजना विशेष दुरुस्ती, नवीन विंधन विहिरी, विहीर खोलीकरण तसेच स्त्रोत बळकटीकरण अशा विविध उपाययोजनांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सध्या प्रत्यक्ष सुरू असलेल्या सर्व ३३ उपाययोजना या विहीर अधिग्रहणाशी संबंधित असून जानेवारी ते मार्च दरम्यान ७ तर एप्रिल ते जून दरम्यान २६ योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. तालुकानिहाय पाहता मानोरा तालुक्यात सर्वाधिक १० उपाययोजना राबविल्या जात असून, वाशिम व कारंजा तालुक्यात प्रत्येकी ८, तर मालेगाव तालुक्यात ७ उपाययोजना सुरू आहेत. दरम्यान, उर्वरित मंजूर उपाययोजना टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याचे नियोजन प्रशासनाकडून करण्यात येणार आहे.

पाणीटंचाईची झळ कमी करण्यासाठी स्थानिक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून आवश्यकतेनुसार तातडीने अतिरिक्त उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले असून, पाणीपुरवठा व्यवस्थापनासाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे सांगितले आहे.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा चारा सुरक्षा आराखडा संभाव्य चारा टंचाईचा सामना करण्यासाठी जिल्हा स्तरावर चारा सुरक्षा आराखडे तयार करण्यात येत असून, हिरव्या चाऱ्याची व सुक्या चाऱ्याची तूट लक्षात घेऊन उपाययोजना राबवल्या जाणार आहेत. जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत तसेच आपत्ती निवारण निधीतून चारा बियाणे खरेदीस प्राधान्य दिले जाणार आहे. मका, ज्वारी, बाजरी यांसारख्या उच्च प्रतीच्या बियाण्यांचा वेळेत पुरवठा, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा उत्पादन, मुरघास प्रकल्प, मिनी टीएमआर आणि कडबाकुट्टी यंत्रांचे वाटप यावर भर देण्यात येणार आहे. तसेच धरण गाळपेरा क्षेत्र व नदीकाठच्या जमिनींवर चारा लागवड आणि साठवणुकीचे अचूक नियोजन करून पशुधन संरक्षण अधिक सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

---

## वाशिम जिल्हा परिषदेने ३०५ कोटींचा विकासनिधी अडकवला एफडी मध्ये !

### 'आप'चे प्रधान सचिवांना निवेदन : उच्चस्तरीय चौकशी, फौजदारी कारवाईची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●


वाशीम जि.प. मध्ये टक्केवारीच आधी...
खर्च नाही निधी, ठेवीचाच विधी !
* ३०५ कोटींच्या व्यवहाराचे प्रकरण * उघडकीस आले FD चे धोरण

वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील ३०५ कोटी ७० लाखांचा निधी विकासकामांवर खर्च न करता शासन निर्णयाचे उल्लंघन करून विविध बँकांमध्ये मुदत ठेवी म्हणून गुंतवला. या गंभीर प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी आम आदमी पार्टीचे राम पाटील डोरले यांनी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले की, वाशिम जिल्हा हा केंद्र शासनाने घोषित केलेला आकांक्षित जिल्हा आहे. नियमानुसार या जिल्ह्यासाठी प्राप्त झालेला निधी शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी पुरवठा व पायाभूत सुविधांवर प्राधान्याने खर्च करणे बंधनकारक आहे. परंतु, २०२४-२५ मध्ये विकासकामांसाठी एकूण ३०५ कोटी ७० लाखांचा निधी प्राप्त झाला. मात्र, जनहिताच्या कामांसाठी खर्च न करता मुदती ठेवींमध्ये ठेवला आहे. ज्यामध्ये जिल्हा निधी १६५.८५ कोटी, उपकर निधी ६८ कोटी, अभिकरण निधी २ कोटी व इतर ३९.८५ कोटी असे वेगवेगळ्या राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांमध्ये मुदती ठेवी म्हणून ठेवण्यात आला. आकांक्षित जिल्ह्याचा निधी जाणीवपूर्वक खर्च न केल्यामुळे हजारो अत्यावश्यक कामे प्रलंबित राहिली. वित्त विभागाच्या १४ जून २०२१ च्या शासन निर्णयाचे स्पष्ट उल्लंघन झाले असून, कमी व्याजदराने ठराविक बँकांमध्ये ठेवून आर्थिक लाभ मिळविल्याचा दाट संशय असल्याचा आरोप निवेदनाद्वारे करण्यात आला आहे. आपने या प्रकरणाची सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली १५ दिवसात उच्चस्तरीय चौकशी करून, दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन, लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत फौजदारी गुन्हा व महालेखापालांकडून स्पेशल ऑडीट करण्याची मागणी केली आहे.

१५ दिवसात ठोस कार्यवाही न झाल्यास मंत्रालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन छेडू व उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा राम पाटील डोरले यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

---

## बस रेल्वे मध्ये प्रवाशांना लक्ष्य करून खिसे कापणाऱ्या अट्टल चोरट्याला अटक

### २ लाख ९९ हजारांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



वाशीम शहरात बस,रेल्वे मध्ये प्रवाशांना लक्ष्य करून खिसे कापणाऱ्या अट्टल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.त्याच्याकडून मोबाईल, सोने, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आलं आहे. पुढील तपास शहर पोलीस करीत आहे.

वाशिम शहरात खिसेकापूगिरी करणाऱ्या अट्टल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करत मोठी कारवाई केली आहे. राजकुमार उर्फ साधु कड्डु डोडे असे आरोपीचे नाव असून तो मध्यप्रदेशातील नेपानगरचा रहिवासी आहे. अकोला नाका परिसरात सापळा रचत पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं. या कारवाईत आरोपीकडून तब्बल २ लाख ९९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात रोख रक्कम, १३ मोबाईल आणि सोने-चांदीचे दागिने यांचा समावेश आहे. आरोपीने वाशिमसह नांदेड आणि भुसावळ येथेही चोरी केल्याची कबुली दिली असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई वाशिम स्थानिक शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव आणि त्यांच्या पथकाने केली

७

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

सोमवार, दि.४ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# दिवसरात्र एसीचा गारवा ; त्वचा कोरडी, श्वसनविकारांचाही धोका !

## उष्णतेपासून दिलासा मिळवताना आरोग्यावर दुष्परिणाम

प्रतिनिधी ४ मे

**खामगाव :** विदर्भात उन्हाचा पारा दिवसेंदिवस चढत असून, उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिकांकडून एअर कंडिशनर (एसी) चा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. घर, कार्यालये तसेच व्यावसायिक आस्थापनांमध्ये दिवसरात्र एसी सुरू ठेवण्याची प्रवृत्ती वाढत आहे; मात्र या अतिवापराचे आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतात, असा इशारा श्वसनविकार तज्ज्ञांनी दिला आहे.

एसीमुळे तात्पुरता गारवा मिळत असला, तरी सतत थंड वातावरणात राहिल्याने शरीराच्या नैसर्गिक समतोलावर परिणाम होतो. त्वचा कोरडी पडणे, श्वसनाचे विकार वाढणे,



सांधेदुखी, डोकेदुखी तसेच रोगप्रतिकारक शक्ती कमी होण्याचा धोका निर्माण होतो. विशेषतः अस्थमा व ॲलर्जी असलेल्या व्यक्तींनी एसीचा वापर करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

### सांधे आणि स्नायू दुखी

सतत थंड वातावरणात राहिल्याने रक्ताभिसरणावर परिणाम होतो. यामुळे सांधेदुखी, स्नायूंमध्ये कडकपणा व वेदना जाणवू शकतात.

### तापमान ४२ अंशांकडे

विदर्भातील अनेक भागांमध्ये तापमान ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक हैराण झाले असून, उकाड्यापासून बचावासाठी एसी, कूलर आणि पंख्यांचा वापर वाढला आहे.

### एसीचा अतिवापर; आरोग्याला धोका

दिवसरात्र एसीमध्ये राहिल्याने शरीराला बाहेरील तापमानाशी जुळवून घेणे कठीण होते. परिणामी तापमानातील अचानक बदल सहन करण्याची क्षमता कमी होते आणि विविध आरोग्य समस्यांना आमंत्रण मिळते. एसीचे फिल्टर वेळेवर स्वच्छ न केल्यास त्यामध्ये धूळ, बुरशी व जीवाणू साचतात. यामुळे श्वसनविकार आणि संसर्गाचा धोका वाढतो.एसीमधील थंड आणि कोरडी हवा श्वसनमार्गाला त्रासदायक ठरते. त्यामुळे खोकला, घसा खवखवणे, सर्दी तसेच ॲलर्जीचे प्रमाण वाढू शकते. अस्थमा असलेल्या रुग्णांमध्ये लक्षणे तीव्र होण्याची शक्यता असते. एसीमधील कोरड्या हवेमुळे त्वचेतील ओलावा कमी होतो. परिणामी त्वचा कोरडी, खाज सुटणारी होते, तर केस निस्तेज व तुटणारे बनतात.दीर्घकाळ एसीमध्ये राहिल्याने काहींना डोकेदुखी, चक्कर येणे व सतत थकवा जाणवण्याची समस्या उद्भवू शकते

# खामगाव तालुक्याचा 94.89 टक्के निकाल ; यंदा कामगिरीत सुधारणा !

## यंदाही मुलींनीच मारली बाजी: मुलांपेक्षा ४.११ टक्क्यांनी सरस कामगिरी!

प्रतिनिधी ४ मे

**खामगाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (बारावी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत खामगाव तालुक्याचा एकूण निकाल ९४.८९ टक्के लागला असून, गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या कामगिरीत सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे.

यंदाच्या निकालात मुलींचे यश ९६.९७टक्के राहिले असून, ते मुलांच्या तुलनेत (९२.८६ टक्के) ४.११ टक्क्यांनी अधिक आहे.

पुनर्परीक्षार्थी श्रेणीत तालुक्याचा निकाल ६४.९३ टक्के लागला आहे. या श्रेणीत २३१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी १५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या गटातही मुलींनी ७०.६५ टक्के निकाल नोंदवत मुलांपेक्षा (६१.१५ टक्के) सरस कामगिरी केली आहे. तालुक्यातील बहुतांश शाळांचा निकाल हा शंभर टक्के लागला आहे.

### शाळानिहाय निकाल

अंजुमन उच्च माध्यमिक शाळा खामगाव ९९.३८ टक्के, केला हिंदी उच्च माध्यमिक शाळा खामगाव ६१.९० टक्के, जी. एस. कनिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खामगाव ९१.९० टक्के, जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय मुले खामगाव ८८.०५ टक्के, श्री अर्जन खिमजी नॅशनल ज्युनियर कॉलेज खामगाव ९१.०८ टक्के, जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय (मराठी) बोथाकाझी ९६ टक्के, जिल्हा परिषद मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय खामगाव ९३.९३ टक्के, श्री. जे. व्ही. मेहता नवयुग कनिष्ठ महाविद्यालय खामगाव ९५.८३ टक्के, महात्मा फुले कला उच्च माध्यमिक विद्यालय पळशी (बु.) १०० टक्के, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळगाव राजा २०.७४ टक्के, महात्मा ज्योतिबा फुले ज्युनियर कॉलेज लाखनवाडा ९७.९१ टक्के, एस. एम. स्व. बी. शिंगणे कला विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खामगाव ८७.५० टक्के, महात्मा फुले कला कनिष्ठ महाविद्यालय मांडका ८१.५२ टक्के.

# पातुर्डा ते शेगाव मार्गावरील वाळलेली झाडे ठरताहेत जीवघेणी

**खामगाव :** शेगाव-पातुर्डा या सुमारे २५ किलोमीटर अंतराच्या मार्गावर दुतर्फा उभी असलेली जुनी, जीर्ण व पूर्णतः वाळलेली झाडे वाहनचालकांसाठी गंभीर धोका ठरत आहेत. या मार्गावर बाभळीची शेकडो झाडे पूर्णपणे वाळलेली असून, अनेक झाडांच्या मोठ्या फांद्या रस्त्यावर झुकलेल्या आहेत. या फांद्या कधीही कोसळण्याच्या स्थितीत असल्याने वाहनचालकांचा जीव धोक्यात येत आहे. वादळी वाऱ्यामुळे तसेच वेगाने धावणाऱ्या वाहनांच्या कंपनामुळे फांद्या तुटुन पडण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. गेल्या तीन महिन्यांत अशाच घटनांमध्ये चार दुचाकीस्वार जखमी झाले असून, एका कारचेही मोठे नुकसान झाले आहे. ३० एप्रिल रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या शेगाव-चिचखेड बसवर झाडाची फांदी कोसळल्याची घटना घडली.रात्रीच्या वेळी प्रकाशाअभावी ही वाळलेली झाडे स्पष्ट दिसत नसल्याने धोका अधिकच वाढतो.

# मलकापूर शहरातील पोलिस निवासस्थानांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**मलकापूर :** जनतेच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या शहर व ग्रामीण पोलिसांच्या निवासस्थानांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गत अनेक वर्षांपासून या निवासस्थानांच्या दुरुस्ती किंवा नव्या बांधकामाचा प्रस्ताव शासनदरबारी रखडल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतींबाबत धोक्याचा इशारा देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. काही शहर व ग्रामीण पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अनेक वर्षांपूर्वी १४० निवासस्थानांची उभारणी करण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात या निवासस्थानांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला; मात्र कालांतराने ही घरे जीर्णावस्थेत गेली आहेत. प्राप्त माहितीनुसार, मलकापूर ६६ शहर पोलिस ठाण्याच्या आवारात अधिकाऱ्यांसाठी २ आणि कर्मचाऱ्यांसाठी ४७छोटा बाजार येथे ७, मदार टेकडी येथे ७, तसेच सालीपुरा परिसरात शहर पोलिसांसाठी ५७ आणि ग्रामीण पोलिसांसाठी २० अशी एकूण १४० निवासस्थाने असून, त्यांची स्थिती अत्यंत निवासस्थाने आहेत. याशिवाय खराब झाली आहे.

# नळगंगा नदीपात्रातील जलपर्णी निर्मूलनार्थ पालिकेच्या हालचाली

प्रतिनिधी ४ मे

**मलकापूर :** शहरातून वाहणाऱ्या नळगंगा नदीचे पात्र सध्या जलपर्णी वनस्पतीच्या विळख्यात सापडलेली असून, त्यामुळे मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी, नदीकाठच्या हजारो नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाने जलपर्णी निर्मूलनासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

मलकापूर हे विदर्भाचे प्रवेशद्वार मानले जाते आणि शहरातून वाहणारी नळगंगा नदी



स्थानिकांसाठी महत्त्वाची आहे; मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीपात्रात जलपर्णीची वाढ सातत्याने होत असून, यंदाही परिस्थिती गंभीर झाली आहे. नदीचे मोठे क्षेत्र जलपर्णीने व्यापल्याने पाण्याचा प्रवाह मंदावला असून, दूषित पाण्यामुळे पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत.

नळगंगा नदीतील जलपर्णी निर्मूलनासाठी नगराध्यक्ष अतिक जवारीवाले यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पालिका प्रशासनाने गेल्या तीन-चार दिवसांपासून नदीपात्रातील

### मच्छरांचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्याचा धोका

जलपर्णी काढण्याची मोहीम सुरू केली आहे. यासाठी यंत्रसामग्री व मनुष्यबळाचा वापर करून नदी स्वच्छ करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

### नागरिकांना दिलासा

नळगंगा नदीकाठच्या परिसरात जलपर्णीमुळे समस्या वाढल्या आहेत.(नगरपालिका प्रशासनाने ही मोहीम सातत्याने राबविणे गरजेचे आहे. यामुळे नदीचे मूळ स्वरूप पुन्हा प्राप्त होऊन परिसरातील नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भरधाव कारची दुचाकीस धडक, वडील ठार, मुलगा गंभीर जखमी

प्रतिनिधी ४ मे

**संग्रामपूर :** भरधाव कारने दुचाकीस धडक दिल्याने वडील जागीच ठार झाले तर मुलगा गंभीर जखमी झाला. ही घटना राष्ट्रीय महामार्गावर बाभुळगाव नजीक शनिवारी (२ मे) सायंकाळी एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. रविंद्र रामकृष्ण अढाव (वय ५०, रा. पातुर्डा) असे मृतकाचे नाव असून त्यांचा मुलगा पियुष रविंद्र अढाव (वय १७) हा गंभीर जखमी आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविंद्र अढाव व त्यांचा मुलगा पियुष हे वाशिंबा येथील नातेवाईकांकडून मोटारसायकल (क्र. एमएच २८ ओव्ही ६१२८) ने अकोल्याकडे परत येत होते. बाभुळगावजवळील जवाहर नवोदय विद्यालय परिसरात मागून येणाऱ्या जीजे २६ एई ९०७३ क्रमांकाच्या कार चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत दोघेही सुमारे ८ ते १० फूट फरफटत गेल्याने गंभीर जखमी झाले. अपघातानंतर कार चालकानेच दोघांना अकोला येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती रविंद्र अढाव यांना मृत घोषित केले. पियुष अढाव याच्यावर सध्या उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच आयपीएस अधिकारी इशानी आनंद, पोलिस उपनिरीक्षक स्वाती वानखडे, हेडकॉन्स्टेबल सचिन धनबहादुर, अशोक मराठे, संतोष डाबेराव आदींनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांनी कारसह चालकाला ताब्यात घेतले असून पुढील तपास एमआयडीसी पोलिसांकडून सुरू आहे.

या मार्गावर गेल्या काही दिवसांपासून अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

आवश्यक ठिकाणी गतिरोधक बसविण्यात यावे, तसेच अपघात स्थळांची पाहणी करून तातडीने उपाययोजना करण्याचा मागणी नागरिक करीत आहेत. याकडे वेळीच लक्ष दिले गेले असते तर काही जणांचे प्राण निश्चित वाचले असते असे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित यंत्रणा आतातरी जागी होईल का? असा प्रश्न विचारला जात आहे.

# शेतीच्या वादातून हाणामारी; कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण; दोघे जखमी

प्रतिनिधी ४ मे

**खामगाव :** नांदुरा तालुक्यातील दहिवडी येथे शेतीच्या वादातून दोन नातेवाइकांमध्ये हाणामारी होऊन कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण केल्याची घटना २ मे रोजी घडली. या घटनेत एक पुरुष व एक महिला जखमी झाले असून, या प्रकरणी नांदुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश धोंडू ढोले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, धोंडू विश्वनाथ ढोले यांच्या नावाने दहिवडी शिवारात शेती असून, त्यावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. संबंधित शेतीचा काही भाग त्यांनी चुलत भाऊ मुकुंदा गजानन ढोले याला ठोक्याने दिला होता. मात्र, याच शेतीवरून दोघांमध्ये वाद सुरू असल्याचे समोर आले आहे. तक्रारीनुसार, २ मे रोजी गणेश ढोले व त्यांची आई कमलाबाई धोंडू ढोले शेतात काम करत असताना मुकुंदा ढोले हा हातात कुऱ्हाड घेऊन तेथे आला. त्याने 'ही शेती पेरू नका' असा दम दिला. यावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. वाद वाढताच मुकुंदा ढोले याने हातातील कुऱ्हाडीच्या दांड्याने गणेश ढोले यांच्या कानावर हल्ला केला, ज्यामुळे ते जखमी झाले. दरम्यान, गणेश ढोले यांची आई कमलाबाई यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनाही कुऱ्हाडीच्या दांड्याने कपाळावर व डोक्याच्या मागील बाजूस मारहाण करण्यात आली, तसेच मुकुंदा ढोले याची आई पुष्पाबाई गजानन ढोले हिने विळ्याने कमलाबाई यांच्या पायावर वार करून त्यांना जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# हार्वेस्टर चालकाचा खून ; आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ४ मे

**साखरखेर्डा :** लव्हाळा-मेहकर मार्गावरील पिंपळगाव उंडा परिसरात हार्वेस्टर चालकाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, साखरखेर्डा पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपीला अटक करत प्रकरणाचा छडा लावला आहे. ही घटना २९ एप्रिलच्या रात्री घडली.

मृत व्यक्तीचे नाव करमजीतसिंग जनमजीतसिंग (५५, रा. पंजाब) असे आहे. ते



पंजाबमधील शाकिरपूरखान येथून सात मजुरांसह या भागात कापणीच्या कामासाठी आले होते. पिंपळगाव उंडा येथील एका धाब्याजवळ त्यांचा मुक्काम होता. प्राथमिक माहितीनुसार, २९ एप्रिलच्या रात्री करमजीतसिंग आणि बबलूसिंग करणसिंग यांच्यात किरकोळ वाद झाला.

या वादात शिवीगाळ झाल्याने संतप्त झालेल्या बबलूसिंगने रात्री आठ ते नऊ वाजताच्या सुमारास लोखंडी रॉडने करमजीतसिंग यांच्या डोक्यावर वार केले. यात ते गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यूमुखी पडले. घटनेनंतर संशय टाळण्यासाठी आरोपीने मृतदेह खाटेवर झोपवून ठेवला आणि इतर कामगारांना दूर झोपण्यास सांगितले. मात्र ३० एप्रिल रोजी शिवाजी काळे यांना संशय आल्याने त्यांनी पाहणी केली असता करमजीतसिंग मृतावस्थेत आढळून आले.


# बुलढाणा जिल्ह्यातील 105 शाळांचा शंभर टक्के निकाल


## एकाही शाळेचा निकाल शून्य नाही!

प्रतिनिधी ४ मे

**बुलढाणा :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी २०२६ च्या बारावी परीक्षेच्या निकालात बुलढाणा जिल्ह्याने यंदा उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. जिल्ह्यातील तब्बल १०५ कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल शंभर टक्के लागला असून, विशेष म्हणजे एकाही शाळेचा एकूण निकाल शून्य टक्के नाही, ही बाब शिक्षण व्यवस्थेसाठी दिलासादायक मानली जात आहे.

जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांतील शाळांचा या यशामध्ये समावेश आहे. बुलढाणा, चिखली, मेहकर, खामगाव, सिंदखेडराजा, लोणार या तालुक्यांतील अनेक संस्थांनी शत-प्रतिशत निकाल देत गुणवत्ता टिकवून ठेवली. ग्रामीण भागातील काही शाळांनीही उत्कृष्ट कामगिरी करत शहरांनाही मागे टाकल्याचे चित्र दिसत आहे. विशेष लक्षवेधी बाब म्हणजे, जिल्ह्यातील एकूण ३६२ शाळांपैकी १०५ शाळांनी १०० टक्के निकाल दिला. म्हणजेच सुमारे २९ टक्के शाळांचा निकाल शंभर टक्के आहे. जिल्ह्यात एकाही शाळेचा निकाल शून्य टक्के नसला, तरी काही ठिकाणी शाखानिहाय निकालात तफावत दिसून आली आहे. काही कनिष्ठ महाविद्यालयांत विशिष्ट शाखांमध्ये अत्यल्प उत्तीर्णता नोंदली गेली असली, तरी एकूण निकाल समाधानकारक राहिला आहे. शिक्षणक्षेत्रातील जाणकारांच्या मते, सातत्यपूर्ण शैक्षणिक पाठपुरावा, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर, तसेच शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील समन्वय यामुळे ही कामगिरी शक्य झाली आहे.





# 9 वाघ, 3 बिबटसह 690 वन्यजीव अंबाबरवा अभयारण्यात आढळून आले

प्रतिनिधी ४ मे

**संग्रामपूर :** तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगात असलेल्या सोनाळा वन्यजिव वनपरिक्षेत्र अंतर्गत अंबाबरवा पर्यटन असून दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी अभयारण्यातील लख्ख चंद्र प्रकाशात विविध प्राण्यांची गणना करण्यात येत असते. त्यानुसार ह्या वर्षी सुद्धा दि.१ / मे /२०२६ ते २/ मे या कालावधीत निसर्ग अनुभव उपक्रम राबविण्यात आला असता प्राणी गणने दरम्यान ९ पैकी ४ बछडे पिल्ले ,बिबटे ३ सह एकूण ६९० हिंस्त्र प्राण्यांसह इतर प्राणी वन्जिव आढळून आलेत.

तालुक्यातील निसर्गरम्य अंबाबारवा अभयाण्यात विविध झाडे, वनौषधी , वेलींनी नटलेले असून पशुपक्षी व हिंस्त्र प्राण्यांचा इतर प्राणी वावरत आहेत. त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी ह्या अभयारणात ३२ बीट असून ५५ कर्मचारी समाविष्ट आहेत. १२ निसर्ग प्रेमींनी पर्यटनासाठी येऊन भेट





दिली. प्राण्यांना पिण्याच्या पाण्याचे ३३ पानवठे आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी वन्यजीव सोनाळा परिक्षेत्रात गणना दरम्यान वाघ -९ पैकी ४बछडे पिल्ले , बिबटे -३ ,अस्वल -१७ , निलगा -५१ , सांबर -८७ , बेडकी- २० , गवा -४६ , रानडुक्कर -७९ , माकड -२०८, मसण्या उद-३ , रान कोंबडी -३८ , रानमांजर- ८ , मोर-९० , ससा- २०, रानकुत्रा -१०, मुंगूस-१, असे एकूण ६९० विविध वन्य जीव प्राणी आढळून आले असून तडस, लंगूर, सायळ ,कोल्हा ,लांडगा,चतळ ,चौसिंगा आदी प्राणी आढळून आले नाहीत .अशी माहिती वन्यजीव सोनाळा परिक्षेत्र अधिकारी एस ए आंबेकर यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे आमच्या प्रतिनिधीला दिली आहे.या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी वन्यजीव सोनाळा अजय बावणे,दीपक सपकाळ (वनपाल), देव बेराड (वनरक्षक),सुमित पालकर (वन मार्गदर्शक) हे उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. ४ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले जिल्हा बँकेचे कौतुक

♦ जिल्हा बँकेचे नवनियुक्त अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांचा केला सत्कार

प्रतिनिधी ४ मे

**वाशिम :** राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांच्यात सहकार क्षेत्रातील विविध विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा महाराष्ट्र दिनी वाशिम येथे पार पडली. या भेटीदरम्यान सहकार क्षेत्राचे बळकटीकरण आणि बँकेच्या आधुनिक सेवांबाबत सविस्तर विचारमंथन करण्यात आले.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जिल्हा बँकेच्या दोन्ही जिल्ह्यातील कार्याचे व शेतकऱ्यांच्या हक्काची बँक म्हणून यावेळी गौरविले.



या बैठकीत बँकेच्या ई-केवायसी प्रणालीचे आणि एईपीएस मार्फत कोणत्याही बँकेचे पेमेंट काढण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सहकार मंत्र्यांना दाखवण्यात आले. जिल्हा बँक दोन्ही जिल्ह्यांतील शेवटच्या घटकापर्यंत आणि शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून घरपोच सेवा देत असल्याबद्दल नामदार बाबासाहेब पाटील यांनी बँकेच्या प्रगतीचे विशेष कौतुक केले. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी संस्थांची भूमिका महत्वाची आहे. जिल्हा बँकांनी शेतकऱ्यांना सुलभ कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित केल्या गेली. बँकिंग व्यवस्थेमध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता आणण्यावर भर देण्याचे यावेळी सहकार मंत्र्यांनी सांगितले.

बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्धार व्यक्त केला. शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी बँकेच्या योजना प्रभावीपणे राबवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सहकार मंत्र्यांच्या हस्ते डॉ. जयराज कोरपे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी वाशिमचे आमदार श्याम खोडे, कृषी उत्पन्न बाजार समिती वाशिमचे संचालक सुभाष चौधरी, बँकेचे संचालक धनंजय गोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य, सहकार विभागाचे अधिकारी रवींद्र सावंत, महेश कच्छवे आणि बँकेचे मुख्याधिकारी संजय खवले उपस्थित होते.

# भुसावळ–अकोला रेल्वेचा वेग आता सुसाट !

ऑटोमॅटिक सिग्नलिंग प्रणालीचा 'धडाका'
वेळेची बचत आणि सुरक्षितता होणार अधिक प्रभावी !

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** रेल्वे प्रवाशांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. भुसावळ ते अकोला या रेल्वे मार्गावरील प्रवासाचा वेग आता प्रचंड वाढणार आहे. तांत्रिक अडथळ्यांमुळे रखडणारा प्रवास आता इतिहास जमा होणार असून, या मार्गावर रेल्वे गाड्या चक्क ताशी १३० किलोमीटर वेगाने धावणार आहेत.

आधुनिक सिग्नलिंग प्रणाली कार्यान्वित झाल्यामुळे रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना मोठा दिलासा दिला आहे. भुसावळ ते अकोला या १३५ किलोमीटरच्या रेल्वे मार्गावर प्रवाशांना आता गतीचा अनुभव घेता येणार आहे. याआधी पारस, गायगाव आणि अकोला दरम्यानच्या १९.९१ किलोमीटरच्या अंतरात 'स्वयंचलित सिग्नल प्रणाली' नसल्यामुळे गाड्यांना ताशी ११० ते १२० किलोमीटर वेगानेच धावे लागत होते. मात्र, २३ एप्रिलपासून या मार्गावर 'स्वयंचलित ब्लॉक सिग्नलिंग प्रणाली' पूर्णतः कार्यान्वित करण्यात आली आहे. संपूर्ण १३५ किमीच्या मार्गावर आता गाड्या ताशी १३० किमी वेगाने धावू शकतील. नवीन प्रणालीमध्ये २४ ऑटो सिग्नल, १२ सेमी ऑटो सिग्नल आणि ४८ फायबर ओएफसी नेटवर्कचा वापर करण्यात आला आहे. रेल्वे प्रशासनाने अकोला स्थानकातील आरआरआय प्रणाली आणि गायगाव येथील इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगमध्येही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे केवळ वेगच वाढणार नाही, तर रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित आणि नियंत्रित पद्धतीने पार पडणार आहे. एकूणच, या सुसाट वेगामुळे प्रवाशांचा वेळ वाचणार असून विदर्भातील रेल्वे प्रवासाला आता नवी गती मिळणार आहे.

# आरपीएफ जवानांच्या छातीवर धडकणार 'तिसरा डोळा'

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि धावत्या गाड्यांमधील चोऱ्यांचे प्रमाण रोखण्यासाठी भुसावळ आरपीएफने आता कंबर कसली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत विभागात तब्बल ६० नवीन 'बॉडी वॉर्न' कॅमेरे दाखल झाले आहेत.

आर पी एफ जवानांच्या शर्टच्या खिशावर बसवलेले हे कॅमेरे आता गुन्हेगारांच्या प्रत्येक हालचालीवर डिजिटल नजर ठेवणार आहेत. विशेषतः गर्दीच्या जनरल डब्यांवर आता आरपीएफचा विशेष वॉच असणार आहे. मध्य रेल्वेचा कणा समजल्या जाणाऱ्या भुसावळ विभागाचे कार्यक्षेत्र इगतपुरी ते बडनेरा आणि भुसावळ ते खंडवा असे अफाट पसरलेले आहे. एवढ्या मोठ्या क्षेत्रात गुन्हेगारांवर वचक ठेवणे प्रशासनासमोर मोठे आव्हान होते. मात्र, आता हे आव्हान पेलण्यासाठी भुसावळ आरपीएफ सज्ज झाली आहे. जवानांना देण्यात आलेले हे ६० नवीन बॉडी वॉर्न कॅमेरे थेट आरपीएफ कंट्रोल रूमला जोडलेले आहेत.

# परवानगीशिवाय गॅस पाइपलाईन खोदकाम

♦ शेकडो फळझाडांचे नुकसान, शेतकऱ्यांचा इशारा

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** जिल्ह्यातील बार्शीटाकळी परिसरात गॅस पाइपलाईन टाकण्याच्या कामामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याची घटना समोर आली आहे. एका खाजगी कंपनीने शेतकरी प्रमोद इंगळे यांच्या शेतातून कोणतीही पूर्वपरवानगी किंवा सूचना न देता खोदकाम सुरू केले. या कामादरम्यान सुमारे ३०० लिंबू आणि २०० सीताफळाच्या लागवड केलेल्या झाडांपैकी काही झाडांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या झाडांवरच इंगळे कुटुंबाचे उत्पन्न अवलंबून होते. घटना लक्षात येताच शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत कामगारांना जाब विचारला, मात्र समाधानकारक उत्तर न मिळाल्याने काम थांबवण्यात आले. नुकसान भरपाई व न्याय मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अद्याप पोलीस तक्रार दाखल नसली तरी न्याय न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा देण्यात आला आहे.



# २३ कर्मचारी पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामध्ये उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यासाठी 'रेल सेवा पुरस्कार २०२५' वितरण सोहळ्याचे आयोजन गुरुवारी पार पडला. या कार्यक्रमाला मंडळ रेल्वे प्रदीप कामले हे व्यवस्थापक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर अप्पर मंडल रेल व्यवस्थापक कल्याण राजू हे मान्यवर पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

स्वागत भाषण विभागीय कार्मिक अधिकारी, समन्वय श्रीमती रसना देवी यांनी केले. यावेळी अप्पर व्यवस्थापक सी.एच. कल्याण राजू यांनी कर्मचाऱ्यांच्या कार्याची प्रशंसा करत सुरक्षितता, कार्यक्षमता आणि प्रवासी सेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

# आरोग्य सेवेचे नवे पर्व ; 'निश्चय हॉस्पिटल'चा दिमाखदार शुभारंभ

प्रतिनिधी ४ मे





**अकोला :** अकोलेकरांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत, गांधी रोड येथील 'निश्चय हॉस्पिटल - लंग्स अँड अर्थरायटिस सेंटर' चे भव्य उद्घाटन झाले. रविवार, ३ मे २०२६ रोजी आयोजित सोहळ्याला शहरातील मान्यवर आणि वैद्यकीय क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते. या रुग्णालयाच्या माध्यमातून विदर्भ क्षेत्राला दोन अनुभवी आणि उच्चशिक्षित तज्ज्ञांच्या सेवा मिळणार आहेत. डॉ. यश संजय केडिया (श्वसन विकार तज्ज्ञ) हे नागपूरनंतर विदर्भातील एकमेव डीएम (Pulmonary and Critical Care Medicine) डॉक्टर आहेत. त्यांनी जर्मनीतून 'अॅडव्हान्स इंटरव्हेंशन ट्रेनिंग' आणि 'ईंश (युरोप) सारख्या अनेक आंतरराष्ट्रीय पदव्या प्राप्त केल्या आहेत. डॉ. नीती यश केडिया संधिवात तज्ज्ञ ह्या सुवर्णपदक विजेत्या असून दिल्लीतून रुमेटोलॉजीमध्ये फेलोशिप पूर्ण केली आहे. त्या बालरोग संधिवात (Paediatric Rheumatology) आणि मस्क्युलोस्केलेटल अल्ट्रासाऊंडमध्ये विशेष प्रशिक्षित आहेत. रुग्णालयात श्वसन आणि संधिवात आजारांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अॅडव्हान्स्ड ब्रॉन्कोस्कोपी, थोरॅकोस्कोपी, स्लीप स्टडी, फुफ्फुसांची बायोप्सी आणि अत्याधुनिक इंटरव्हेशनल पल्मोनोलॉजी सेटअप आहे. रुमेटॉइड अर्थरायटिस, ल्युपस, स्पॉन्डिलायटिस आणि सांध्यांची सोनोग्राफी, तसेच आधुनिक जैविक औषधांच्या (Biologics) इंजेक्शनची सुविधा उपलब्ध आहे. उद्घाटन समारंभ रविवारी संध्याकाळी ५:०० वाजता शर्मा हाईट्स, निशांत टॉवरच्या मागे, गांधी रोड येथे पार पडला. कार्यक्रमा दरम्यान डॉ. संजय केडिया आणि सौ. अनिता केडिया यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. या रुग्णालयामुळे आता अकोला आणि परिसरातील रुग्णांना फुफ्फुसांचे गंभीर आजार आणि क्लिष्ट संधिवाताच्या उपचारांसाठी मोठ्या महानगरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. रुग्ण आपल्या तपासणीसाठी ७४९८४९६९८७ या क्रमांकावर संपर्क साधून अपॉइंटमेंट घेऊ शकतात असे आवाहन केले आहे.

# गायगाव पालखी रस्त्यावर काटेरी झुडूपे

♦ वाहन चालकांसाठी अत्यंत त्रासदायक

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** गायगावला जाणाऱ्या रस्त्यावर दोन्ही बाजूला काटेरी झुडपे वाढलेली दिसतात. या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे. तसेच थोडे दुर्लक्ष झाले तरी काटे बोचतात. मुख्य म्हणजे हा शेगाव वारी मार्ग असून मार्ग सुरळीत असणे आवश्यक आहे. याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

गायगाव शेगाव वारी मार्ग अत्यंत वर्दळीचा आहे. मोठ्या प्रमाणात रहदारी या मार्गावर सुरू असते. त्यामुळे हा मार्ग मोकळा राहणे आवश्यक आहे. परंतु या मार्गावर काटेरी झुडपे वाढलेली आहेत. त्याचा प्रवाशांना त्रास होत आहे. वेळीच कटाई केली नाही तर ती झपाट्याने वाढतील. या झुडपामुळे काही अनिष्ट घडण्यापूर्वी त्यांची कटाई करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग अशा गोष्टींकडे वेळीच लक्ष का देत नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# पोटच्या मुलाची बापाने केली हत्या

## बार्शीटाकळी तालुक्यातील धक्कादायक घटना

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातून एक सुन्न करणारी घटना समोर आली आहे. एका बापाने आपल्या ८ वर्षांच्या एकुलत्या एका मुलाची चाकूने वार करून हत्या केली आणि त्यानंतर स्वतःवरही वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना बार्शीटाकळी तालुक्यातील मिर्झापूर मांगूळ शेत शिवारात घडली.

बुलढाणा जिल्ह्यातील नांदरी येथील एक धनगर कुटुंब काही दिवसांपूर्वी मेंढ्या चारण्यासाठी बार्शीटाकळी तालुक्यात आले होते. आरोपी पित्याला आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता, ज्यावरून त्यांच्यात सतत वाद होत असत. याच वादातून आलेल्या रागाच्या भरात, त्याने आपला मुलगा प्रेम दिलीप मोटे (वय ८ वर्षे) याची धारदार शस्त्राने वार करून हत्या केली. हा चिमुकला कडाक्याच्या उन्हात आपल्या आई-वडिलांना मेंढ्या चारण्यास मदत करत असे. संशयाच्या जाळ्यात अडकलेल्या बापाने आपल्या पोटच्या गोळ्याचा जीव घेतल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांच्या आदेशानुसार, मूर्तीजापूरच्या उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, बार्शीटाकलीचे ठाणेदार प्रवीण धुमाळ, पीएसआय नीलेश चाटे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला आहे. जखमी आरोपी पित्यावर सध्या उपचार सुरू असून, बार्शीटाकळी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार प्रवीण धुमाळ या प्रकरणाचा तपास करत आहेत.



जखमी वडील

# जिल्ह्यात 6 हजार 639 विद्यार्थ्यांनी दिली 'नीटची परीक्षा

## १२३ विद्यार्थी अनुपस्थित : १८ केंद्रांवर परीक्षा शांततेत

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली युजी नीट २०२६ ही परीक्षा रविवार, ३ मे रोजी शांततेत पार पडली. अकोला, मूर्तिजापूर, पातूर व बार्शिटाकळी शहरात एकूण १८ केंद्र निश्चित करण्यात आली होती. ६ हजार ७६२ उमेदवार या परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ६ हजार ६३९ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली असून १२३ विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित राहिले.

**जिल्ह्यात चार शहरात १८ परीक्षा केंद्र**

- ◆ अकोला - १३
- ◆ मूर्तिजापूर - ३
- ◆ बार्शिटाकळी - १
- ◆ पातूर - १

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी मार्फत नीट २०२६ ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यात १८ परीक्षा केंद्र होते या सर्व केंद्रांवर कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याकरिता पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. याशिवाय शहराचे तापमान गेल्या काही दिवसांपासून चाळीस अंशाच्या वर गेलेले आहे. असे असताना तळपत्या उन्हात विद्यार्थ्यांना परीक्षा देणे सोयीचे व्हावे, याकरिता काही परीक्षा केंद्रांवर मंडप टाकून सावलीची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था संबंधित प्रशासनाच्या वतीने करण्यात आली होती. परीक्षा केंद्रांवर बायोमेट्रिक तपासणी करून परीक्षार्थींना शिस्तबद्ध प्रवेश देण्यात आला. परीक्षा समन्वयक म्हणून जवाहर नवोदय विद्यालयाचे उपप्राचार्य डी.पी. तायडे व न्यू इंग्लिश हायस्कूलचे प्राचार्य एम.एच. मुंशी यांनी काम पाहिले.

**अनेक परीक्षा केंद्रांवर गैरसोय**

◆ नीट ही राष्ट्रीय दर्जा परीक्षा असतानाही विद्यार्थ्यांना बसण्याची नीट व्यवस्था नव्हती, अनेक डेक्स-बेंच तुटलेले, हलणारे होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागला. तसेच काही ठिकाणी सावलीची व्यवस्था करण्यात न आल्याने अनेक विद्यार्थ्यांना तपासणीदरम्यान भरउन्हात ताटकळत रहावे लागले. तसेच बाहेरगावच्या विद्यार्थ्यांचा पालकांचीही गैरसोय झाली होती. त्यांना पिण्याचे पाणी व सावली शोधण्यासाठी धावाधाव करावी लागली.

# आता पुन्हा जि.प. करणार खते, बियाण्यांची तपासणी !

♦ वर्षभरापूर्वी राज्य शासनाकडे केले होते हस्तातरित

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** जिल्हा परिषद कृषी विभागाकडील बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या तपासणीचे अधिकार वर्षभरापूर्वी राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले होते. मात्र, आता हे अधिकार पुन्हा जिल्हा परिषद कृषी विभागाकडे देण्यात आले आहेत.

याबाबत राज्य शासनाने ६ एप्रिल रोजी राजपत्र प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी (गट 'ब'), मोहीम अधिकारी तसेच पंचायत समिती स्तरावरील कृषी अधिकाऱ्यांना जिल्ह्यातील बियाणे, खते व कीटकनाशकांच्या तपासणीचे अधिकार पुन्हा देण्यात आले आहेत. या बदलामुळे कामाचा व्याप वाढणे तसेच जिल्हा परिषदेकडून अधिकार काढून घेतल्याबाबत नाराजी व्यक्त होत होती. याची दखल घेत शासनाने पुन्हा संयुक्त पद्धतीने गुणनियंत्रण करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे जिल्हा परिषद व राज्य कृषी विभाग मिळून बियाणे, खते व कीटकनाशकांचे नमुने घेणार आहेत. यापूर्वी जिल्हा परिषद कृषी विभागाकडे असलेले बियाणे, खते व कीटकनाशकांच्या तपासणीचे अधिकार राज्य कृषी विभागाकडे देण्यात आले होते. मात्र, आता पुन्हा हे अधिकार जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी व पंचायत समिती कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, अशी माहिती कृषी विभागामार्फत देण्यात आली आहे.

# गायगावमध्ये 'पेट्रोल माफियांचा' नंगानाच !

♦ मध्यरात्री घरात घुसून वाहनांची तोडफोड ! पोलिसांची गस्त कुठे

प्रतिनिधी ४ मे

**अकोला :** जिल्ह्यातून एक अत्यंत थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. गायगाव परिसरात रविवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास पेट्रोल माफियांच्या टोळीने अक्षरशः उच्छाद मांडला. सीसी टीव्ही फुटेज पाहिल्यावर अकोला जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला राहिला नसल्याचे चित्र अधोरेखित होत आहे.

अकोल्यातील गायगाव हा पेट्रोल आणि डिझेल माफियांचा अड्डा झाला आहे. गायगाव ज्या पोलिस स्टेशन अंतर्गत येते त्यांचा वचक या गुन्हेगारांवर नसल्याचे चित्र तुम्ही व्हिडीओत पाहत आहात. सकाळी सकाळी गावात अशा प्रकारे झालेली तोडफोड ही पोलिसांची गस्त नसल्याचे चित्र अधोरेखित करत असून पोलिस दलाचे बोटचेपी भूमिका या सर्व सीसीटीव्ही फुटेजवरुन समोर आली आहे. गायगाव डेपोमधील अनागोंदी कारभारामुळेच पेट्रोल व डिझेल माफियांच्या टोळ्या गायगाव येथे तयार झाल्या असून त्यांचा हा उच्छाद कायम आहे. वाहनांची तोडफोड करणाऱ्या या गुंडांच्या दहशतीने संपूर्ण परिसर हादरला आहे. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला असून, अकोला पोलीस आता काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पहाटे ४ वाजता जेव्हा संपूर्ण गाव झोपेत होते, तेव्हा ८ ते ९ सशस्त्र गुंडांनी इम्रान खान कयूम खान यांच्या घरावर धाड टाकली. इम्रान खान यांचे कुटुंब सध्या या हल्ल्यामुळे प्रचंड दहशतीखाली आहे. या घटनेने जिल्ह्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढले आहेत. आता या टोळीचा मुख्य सूत्रधार कोण आणि पोलीस त्यांना कधी बेड्या ठोकणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK